0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

वाचले :

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०८/११/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.७८९, दिनांक ०९/११/२०१२, ०३/१२/२०१२, १९/१२/२०१२, ०९/०१/२०१३, १७/०१/२०१३ व २३/०१/२०१३.

३) मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. यांचे वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांचे दिनांक २७/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

४) पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजीचे अभिवेदन.

५) मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजीचे निवेदन.

६) मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजीचा अर्ज.

७) मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. यांचे वतीने ॲड. श्री. पी.अे. पोळ यांचे दिनांक ०१/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे जा.क्र. ठाजिप/शिक्षण/प्राथ/शापोआ/वशी-७१० दिनांक ०४/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

९) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.८७४ दिनांक ०५/१२/२०१२.

१०) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.८७५ दिनांक ०५/१२/२०१२.

११) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.८७६ दिनांक ०५/१२/२०१२.

१२) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.८७७ दिनांक ०५/१२/२०१२.

१३) मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. यांचे वतीने ॲड. श्री. पी.अे. पोळ यांचे दिनांक १०/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१४) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.८८९ दिनांक १२/१२/२०१२.

१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे जा.क्र. ठाजिप/शिक्षण/प्राथ/शापोआ/वशी-७७३ दिनांक १४/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

१६) पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे अभिवेदन.

१७) मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे निवेदन.

१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे जा.क्र. ठाजिप/शिक्षण/प्राथ/शापोआ/वशी-७८५ दिनांक २८/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

१९) शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे क्र. ईओएम/१३७२, दिनांक ०२/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

२०) पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजीचे अभिवेदन.

२१) मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजीचे निवेदन.

२२) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे यांचे दिनांक १५/०१/२०१३ रोजीचे अभिवेदन.

२३) मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक १५/०१/२०१३ रोजीचे निवेदन.

२४) मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

२५) मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक १८/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

२६) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे यांचे दिनांक २१/०१/२०१३ रोजीचे अभिवेदन.

२७) श्री साई मार्केटिंग ॲन्ड ट्रेडिंग कंपनी व विशाल ट्रान्सपोर्ट कंपनी यांचे दिनांक २२/०१/२०१३ रोजीचे स्वतंत्र निवेदने.

२८) मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. यांचे दिनांक २४/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

२९) पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे यांचे दिनांक २९/०१/२०१३ रोजीचे अभिवेदन.

३०) मे. ए.बी. पाटील ॲण्ड सन्स या संस्थेच्या मालकाचा दिनांक २९/०१/२०१३ रोजीचा जबाब.

३१) मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक ३०/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

३२) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.१०८ दिनांक ०४/०२/२०१३.

३३) पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे यांचे दिनांक २८/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

---

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७७/२०१२/जा.३९७  
नियंत्रक शिधावाटप व संचालक  
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,  
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,  
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,  
मुंबई - ४०० ०२०.  
दिनांक : ०९ /०४/२०१३.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ०२.११.२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी) यांच्या अधिपत्याखालील फिरते पथकाने पंचांसह मे. पटेल कोल्ड स्टोरेज च्या अधिपत्त्याखालील मे. वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., नवी मुंबई या ठिकाणी शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ विनापरवाना साठवणूक केल्याबाबत मिळालेल्या गुप्त बातमीची खातरजमा करण्याकरीता नमुद कोल्ड स्टोअरेजच्या अधिपत्त्याखालील

CONTROLLER OF RATI...

वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., नवी मुंबई च्या कंपाऊंडमध्ये प्रवेश करुन तेथील कार्यालयात उपस्थित व्यक्तीस त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव प्रशांत सुरेश पवार असल्याचे तसेच तो येथे व्यवस्थापक म्हणून गेले १ वर्षापासून काम करीत असल्याचे सांगुन सदर गोदामाचे भागीदार इमरान फारुक पटेल व शकील इस्माईल पटेल हे आहेत असे सांगीतले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष त्यांचे गोदामातील शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ ठेवलेला साठा दाखविण्याची मागणी केली. त्यावरुन त्यांनी सदर साठा अधिकाऱ्यास दाखविला. सदर तांदूळ कोणाचा आहे व केव्हापासून येथे ठेवला आहे अशी विचारणा केली असता, श्री. पवार यांनी सांगीतले की, सदर तांदूळ हा इस्कॉन फूड फाऊंडेशन रिलीफ या संस्थेचा शालेय पोषण आहार योजनेचा असुन तो संबंधित संस्थेचे शाखा व्यवस्थापक श्री. सुनिलकुमार परती यांच्यामार्फत ठेवला आहे. सदर साठा माहे जून २०१२ पासून ठेवला असल्याचे सांगुन सदरचा तांदूळ हा भिवंडी व बोरीवली येथील भारतीय खाद्य निगम, येथून ट्रकद्वारे आणला जात असल्याचे सांगुन त्यानुसार येथे साठा करुन ठेवला जातो असे सांगितले. तद्नंतर साठवणुक असलेल्या शालेय पोषण आहार योजनेच्या तांदळाच्या साठयापैकी इस्कॉन फूड फाऊंडेशन रिलीफ या कंपनीकडून श्री. सुनिलकुमार परती यांनी दिलेल्या डि.ओ. (डिलेव्हरी ऑर्डर) वर एस (Ace) इंटरनॅशनल येथे पाठवावयाचा आहे असा पत्ता नमूद असल्याने डि.ओ. वरील नमुद तांदळाचा साठा ट्रकमध्ये भरुन तो एस (Ace) इंटरनॅशनल या ठिकाणी पाठविला जात असल्याचे पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी नमुद वेअरहाऊसमध्ये सद्यस्थितीत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत साठवणुक असलेल्या साठयाबाबत विचारणा केली असता उपस्थित व्यवस्थापक यांनी आज रोजी इस्कॉन चा ५० किलो च्या एकूण १५४५७ बॅग्स् (सुमारे ७७२८.५० क्विं) इतका तांदूळ त्यांच्या रेकॉर्डप्रमाणे शिल्लक असल्याचे सांगितले. तसेच नमूद वेअरहाऊस मध्ये केवळ साठवणूक होते की सदर तांदळाच्या साफसफाईची प्रक्रीया देखील होते किंवा कसे? याबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, श्री. पवार यांनी सांगीतले की, येथे फक्त साठवणूक केली जात असुन त्यांच्या वेअरहाऊसमध्ये साफसफाइची कोणतीही प्रक्रीया केली जात नसल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी नमुद वेअरहाऊस मधील तांदळाच्या साठयाची पंचासमक्ष प्रत्यक्ष मोजदाद केली असता खालीलप्रमाणे आढळून आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५२६७ बाचक्यांमधील प्रत्येकी ५० किलो भरतीप्रमाणे शालेय पोषण आहाराच्या तांदळाचा साठा | ७६३३.५० क्विं. | २,२९,००,५००/- |

दरम्यान अधिकाऱ्यांनी नेरुळ पोलिस ठाणे चे पोलिस निरीक्षक यांचेशी संपर्क साधून त्यांना घटनास्थळाची माहीती देवून त्याप्रमाणे त्यांनी श्री. कदम एन.जी. पोलिस हवालदार, बक्कल क्र. ८६४व श्री. तुंबडा एस.व्ही.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FFICE

पोलिस शिपाई, बक्कल क्र. २९६३ यांना घटनास्थळी पाठविले. सदरचा पंचनामा चालू असताना सुनिलकुमार परती नामे इसम घटनास्थळी उपस्थित झाले व ते मे. इस्कॉन फूड फाऊंडेशन रिलीफ या संस्थेचे मुंबई विभागाचे शाखा व्यवस्थापक असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सुनिलकुमार परती यांच्याकडे सदर घटनास्थळी आढळलेल्या शालेय पोषण आहाराच्या तांदळाच्या साठयाबाबत सखोल चौकशी केली असता, त्यांनी इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन संस्थेमार्फत शालेय विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजन (Mid Day Meal) पुरविले जात असल्याचे सांगुन सदर योजनेअंतर्गत बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील ताडदेव विभाग तसेच ठाणे जिल्हयातील मिरा-भाईंदर महानगरपालिका व ठाणे जिल्हयातील पालघर व वाडा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या अधिपत्त्याखालील असे मिळुन एकुण सुमारे ८५५ शाळेमधील अंदाजे ९५,००० विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन (Mid Day Meal) पुरविण्याचे काम त्यांची संस्था करीत असुन याकरीता संस्थेस दरमहा सुमारे २९०० क्विंटल इतका तांदळाची आवश्यकता असल्याचे सांगितले.

सदरचा तांदळाचा साठा त्यांनी भिवंडी-बोरीवली येथील भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून उचल केला असुन सदर गोदामातून तांदळाची उचल केल्यानंतर शासन निर्णयाप्रमाणे संबंधित शाळा किंवा अधिकृत स्वयंपाकघर येथे नियोजित ठिकाणी थेट पोहंच करणे आवश्यक आहे. परंतू ताडदेव, मिरा-भाईंदर, पालघर व वाडा या चारही विभागाचा तांदूळ ते पटेल कोल्ड स्टोरेज च्या अधिपत्त्याखालील वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., नवी मुंबई या वेअरहाऊस मध्ये साठवणूक करीत असल्याचे सांगितले. तसेच नमुद वेअरहाऊसमध्ये सदर तांदळाची साफसफाईची प्रक्रीया पूर्ण करुन तो विभागनिहाय चारही केंद्रीय स्वयंपाकघरात पाठविला जात असल्याचे सांगितले. सध्या उपलब्ध असलेला सदरचा साठा हा माहे जून २०१२ पासून साठवणूक करुन ठेवला असुन सदर तांदूळ खराब होऊ नये म्हणून महिन्यातून एकदा ठेवलेल्या साठयाचे धुरीकरण (Fumigation) केले जाते असे त्यांनी सांगीतले.

सदर गोदामात अधिकाऱ्यांनी मोजदाद केली असता साठवणुक असलेला तांदळाचा १५,२६७ बाचक्यांमधील (प्रत्येकी ५० किलो) म्हणजेच ७६३३.५० क्विं. इतका साठा शिल्लक असल्याचे पथकास आढळून आले परंतु सदर संस्थेस दरमहा सुमारे २९०० क्विंटल तांदळाचा साठा संबंधित विभागाकडून नेमुन दिलेल्या शाळांना खिचडी तयार करण्यासाठी पुरविला जात असल्याचे आढळून आले. म्हणजेच नमुद संस्थेने त्यांच्या मासीक आवश्यकतेपेक्षा सुमारे अडीच पट तांदळाचा साठा नमूद गोदामात साठवणुक केले असल्याचे पथकास आढळून आले.



CONTROLLER OF RATIO...

संस्थेला पुरवठा करावयाच्या चार विभागांना विभागनिहाय स्वतंत्र चार केंद्रीय स्वयंपाकघर असताना सदरचा तांदळाचा साठा नमुद संस्थेने चारही विभागापासून विभक्त असलेल्या व वाहतुकीच्या दृष्टीने चारही विभागांना सोयीस्कर नसलेल्या ठिकाणी म्हणजे तुर्भे येथील या वेअरहाऊसमध्ये साठवणूक करुन ठेवण्याचे प्रयोजन काय असे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष शाखा व्यवस्थापक परती यांना विचारले असता, त्यांनी संस्थेने घेतलेले निर्णय त्यांना बंधनकारक असून त्यांचे काम फक्त अंमलबजावणी करण्याचे असल्याचे सांगितले. संदर बाबत उपस्थित शाखा व्यवस्थापक यांचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला.

दरम्यान दिनांक २.११.२०१२ रोजी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या कार्यालयाचे दुसरे पथक अेस (Ace) इंटरनॅशनल, अे-७८८/१, एम.आय.डी.सी. खैराने, नवी मुंबई येथे चौकशी करणे करीता पाठविण्यात आले. सदर पथकाने नमुद ठिकाणी तपासणी केली असता, सदर युनिट चे संबंधित मालक हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील गहू, तांदूळ इ. धान्य साफसफाईच्या नावाखाली घेऊन त्यांच्या मूळ गोण्या बदलून, सदर धान्य नविन गोण्यांत भरुन बाजारात विकतात. साफसफाईच्या नावाखाली ते सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील अन्नधान्याचा नफेखोरीच्या उद्देशाने काळाबाजार करतात. त्याबाबत संबंधित पथकाने अेस (Ace) इंटरनॅशनल चे संबंधित मालक यांचेविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे कायदेशिर फिर्याद दाखल करण्यात आली आहे. यावरुन सदर वेअरहाऊसमध्ये आढळलेला मोठया प्रमाणावरील साठा क्लिनींगच्या नावाखाली अेस (Ace) इंटरनॅशनल या ठिकाणावरुन बेकायदेशीररित्या अवैध मार्गाने विक्री करण्याच्या उद्देशाने साठा करुन ठेवल्याचे सकृतदर्शनी तपासणीत आढळून आल्याचे पंचांसमक्ष आढळून आले आहे.

अधिकाऱ्यांनी सदर मुद्देमाल जागीच जप्त करुन सिलबंद करुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. तसेच धाडीत जप्त केलेला शालेय पोषण आहार योजनेच्या १५,२६७ बाचके (प्रत्येकी ५० किलो) म्हणजे ७६३३.५० क्विं. इतक्या तांदळाची बाजार भावाप्रमाणे (रु. ३०/- प्रति किलो) २,२९,००,५००/- (अक्षरी रुपये दोन कोटी एकोणतीस लाख पाचशे फक्त) एवढया किंमतीचा साठा धाडीत जप्त करण्यात आला.

अशाप्रकारे मे. इस्कॉन फूड फाऊंडेशन रिलीफ चे शाखा मॅनेजर सुनिलकुमार परती तसेच पटेल कोल्ड स्टोरेज च्या अधिपत्याखालील वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., जि.ठाणे चे संचालक इमरान फारुक पटेल व शकील इस्माईल पटेल, तसेच अेस (Ace) इंटरनॅशनल चे मालक पंकज ठक्कर यांनी संगनमताने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांना देय असलेल्या तांदळाच्या साठयाची चोरी करुन साठेबाजी व नफेखोरीच्या उद्देशाने सदर धान्याचा काळाबाजार केल्याचे तपासणीत निष्पन्न झाल्याने त्यांनी शासनाची घोर फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने सर्वसंबंधितांनी जिवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ७, ८

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ... BAI

व १०, पब्लीक डीस्ट्रीब्यूशन सिस्टीम ऑर्डर २००१ तसेच शासन निर्णय शालेय पोषण आहार-१००१/प्र.क्र./१३४/ नापु-१७, दिनांक २७.८.२००१, शासन निर्णय शालेय पोषण आहार-२००४/(२४६/४)/प्राशि/०४, दिनांक १२.७.२००५ चा भंग केल्याने संबंधितांविरुध्द नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ३०४१/२०१२ दिनांक ०३/११/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन रु. २,२९,००,५००/- एवढया किंमतीचा मुद्देमाल जागीच जप्त करुन उपस्थित पोलिसांसमोर सदर गोदाम सिल करुन जप्त मुद्देमाल त्यांचे ताब्यात देण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २९/११/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस नेरुळ पोलिस ठाणे येथील सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. एम. आर. पालांडे यांनी तपासी पोलिस अधिकारी श्री. एल.बी. काळे यांच्या वतीने उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. वेलवर्थ फुड प्रा.लिं.चे संचालक इम्रान फारुख पटेल, मे. वेलवर्थ फुड प्रा.लि.चे संचालक शकील इस्माईल पटेल व मे. वेलवर्थ फुड प्रा.लि.चे व्यवस्थापक प्रशांत सुरेश पवार हे उपस्थित राहिले व त्यांचे वतीने वकालतनाम्यासह ॲड. श्री. पी.अे. पोळ यांनी उपस्थित राहून आवश्यक कागपत्रांसह लेखी निवेदन सादर करणार असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. चे व्यवस्थापक (व्यापार) श्री. भुषण खेबुडकर यांनी वाहतुकदार म्हणून वाचावे क्र. ५ अन्वये त्यांचे लेखी निवेदन सादर करुन प्रत्यक्षात नमुद गोदामावर वाहतुकीसाठी त्यांनी प्राधिकृत केलेले व करारबध्द असलेले मे. विशाल ट्रान्सपोर्ट याची उपवाहतूकदार म्हणून नेमणूक केली असल्याचे सांगितले आहे. तसेच सदर सुनावणीस मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने ॲड. मनीषा परांजपे यांनी उपस्थीत राहून त्यांचे लेखी म्हणणे मांडण्यासाठी ४ आठवड्याची मुदत मागून पुढील सुनावणी घेण्यास विनंती करुन तसा वाचावे क्र. ६ अन्वये विनंती अर्ज सादर केला. सदर सुनावणीस मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनील कुमार रणधिरचंद परती हे उपस्थित राहिले. तसेच मे. एस इंटरनॅशनलचे मालक पंकज ठक्कर सुनावणीस उपस्थित राहिले. तथापी, लेखी निवेदन सादर केले नाही. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने उपस्थित ॲड. मनीषा परांजपे यांनी लेखी म्हणणे सादर करण्यासाठी ४ आठवड्याची मुदत मागितली आहे. तथापी, सदर

0007

प्रकरणी जप्त मुद्देमाल हा नाशवंत असल्याने व सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये उशीर झाल्यास सदरचा साठा हा खराब होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १८/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी, १) मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेस त्यांच्या कार्यक्षेत्रातील नेमुन देण्यात आलेल्या शाळा व लाभार्थी विद्यार्थांच्या तपशिलासह तांदळाची मासिक आवश्यक साठयाची आकडेवारीचा अहवाल. २) मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेस पटेल कोल्ड स्टोरेज च्या अधिपत्त्याखालील मे. वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., जि.ठाणे या कार्यक्षेत्राबाहेरील वेअरहाऊसमध्ये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदळाच्या साठ्याची साठवणूकीस परवानगी दिली किंवा कसे ? ३) प्रस्तुत प्रकरणी संस्थेस त्यांच्या स्वंयपाक घराव्यतिरिक्त इतर ठिकाणी कार्यक्षेत्रांबाहेर गोदामाकरिता परवानगी दिली असल्यास पत्राची प्रत व त्याबांबतचे शासन निर्णय अथवा परिपत्रकाची छायांकित प्रत. ४) प्रचलित पध्दतीनुसार वाहतूकदारास शासकीय गोदामातून संस्थेच्या केंद्रीय स्वंयपाकघरात पुरवठा करण्यास परवानगी असून याप्रकरणी संबंधित वाहतूकदाराने नियोजित ठिकाणी वितरण न करता कार्यक्षेत्राबाहेरील वेअरहाऊसवर वितरण कसे केले, याबाबतचा अहवाल. ५) मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने कार्यक्षेत्राबाहेर वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्यांची बाब त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणुन दिली होती किंवा कसे ? ६) मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या संबंधित विभागातील केंद्रीय स्वयंपाकघर अथवा वेअरहाऊसची त्यांच्या कार्यालयाकडून नियमित तपासणी केली जाते किंवा कसे ? केली असल्यास तपासणी अहवालाची प्रत. या मुद्यांच्या अनुषंगाने, शिक्षणाधिकारी, मिरा-भाईदर महानगरपालिका यांना वाचावे क्र. ९ अन्वये, शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना वाचावे क्र. १० अन्वये, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांना वाचावे क्र. ११ अन्वये स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत त्यांना पत्रे निर्गमित करण्यात आली. तसेच मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांना अवगत करण्याबाबत वाचावे क्र. १२ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

तद्नंतर मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. चे संचालक यांचे वतीने वकिलामार्फत सादर केलेल्या वाचावे क्र. ७ व १३ अन्वये टपालामार्फत प्राप्त निवेदनात, नमूद गुन्ह्यामध्ये त्यांचे वेअरहाऊस सिलबंद करण्यात आल्याने त्यांचे व्यवसाय ठप्प झाले असून बँकेच्या कर्जाचे हप्ते थकीत झाले आहे तसेच त्यांच्या अधिपत्त्याखालील कर्मचाऱ्यांनाही ते पगार देऊ शकले नाही. सदर वेअरहाऊस व त्या अंतर्गत असलेले कोल्ड स्टोरेज सिलबंद असल्याने त्यामधील इतर

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

व्यापाऱ्यांचा साठवणूक असलेला परंतू जप्त नसलेला साठ्यांच्या व्यापाऱ्यांना त्यांच्या साठ्याची डिलेव्हरी करावयाची असल्याने त्यांना साठा घेऊन जाण्याबाबत परवानगी मिळावी, असे नमूद केले आहे.

तथापी, सदर प्रकरणी घटनेच्या दिवशी नमूद वेअरहाऊसमध्ये जप्त करण्यात आलेल्या शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदळाच्या साठ्या व्यतिरिक्त उर्वरित व्यापाऱ्यांचा साठवणूक असलेला साठा जप्त करावयाचा नसल्याने तो इतर ठिकाणी स्थलातंरीत करण्याच्या सुचना पथकाने दिल्या होत्या. तथापी, मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. चे संचालक यांनी सदरचा साठा हलविण्यास असमर्थता दर्शविली होती.

सदर प्रकरणी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये सुनावणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे आदेश पारीत करणे उचित होईल. मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. यांचे वतीने केलेल्या विनंती अर्जानुसार नमूद वेअरहाऊसच्या व्यवसायावर त्यांचे व त्यांच्या कर्मचाऱ्यांचे उदरनिर्वाह अवलंबून असल्याने सदरचे वेअरहाऊस सिलमुक्त करण्याचे तसेच उपरोक्त वेअरहाऊसमध्ये विविध व्यापाऱ्यांचा साठवणूक असलेला व जप्त नसलेला साठा हा नाशवंत असल्यास तो खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून सदरचा जप्त नसलेला साठा त्यांच्या साठा मालकास परत करण्यास या कार्यालयाची हरकत नसल्याबाबत तथापी, शालेय पोषण आहार योजने अंतर्गत जप्त असलेला तांदळाचा १५२६७ बाचक्यांतील ७६३३.५० क्विंटल साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत जतन करण्याच्या सुचना देण्यात येण्याबाबत तसेच सदर साठ्याची धुरीकरण (fumigation) ची गरज भासल्यास त्याकरिता संबंधितास परवानगी देण्याबाबत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना तसेच त्याची प्रत मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. यांना देण्याबाबत वाचावे क्र. १४ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस नेरुळ पोलिस ठाणे येथील पोलिस उपनिरिक्षक श्री. सचिन नामदेव ब्रेंद्रे हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. १६ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने वकालतनाम्यासह ॲड. मनिषा परांजपे तसेच व्यवस्थापक सुनिलकुमार परती हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. १७ अन्वये लेखी निवेदन सादर केले. त्यांना शिक्षण विभागाकडून पारीत केलेल्या वर्क ऑर्डरची प्रत तसेच संस्थेचे शिक्षण विभागा सोबतचे करारबध्द दर्शविणारे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यास सुचना दिल्या असता, त्यांनी सद्य:स्थितीत त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. तद्नंतर सदर संस्था शालेय पोषण आहार योजने अंतर्गत कोणत्या कालावधी पर्यंत शिक्षण विभागाशी करारबध्द असल्याबाबत विचारणा केली असता, उपस्थितांनी त्यांची संस्था सदर कामासाठी माहे नोव्हेंबर, २०१२ पर्यंत करारबध्द असल्याचे सांगितले व तद्नंतरच्या कालावधीतही नव्याने करारनामा केल्याचे सांगितले. परंतू सदरचे

CONTROLLER OF RATIONING

पुरावादर्शक कागदपत्रेही त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. मे. वेलवर्थ फुडस् या वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा व मे. इस्कॉन यांना नेमून दिलेल्या तीनही विभागाकरिता आवश्यक असणारा साठा यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आणून दिले असता, सदरची बाब संस्थेच्या वतीने उपस्थितांनी मान्य करुन जप्त साठा हा त्यांच्या आवश्यकते पेक्षा अधिक असल्याचे सांगून शासनाने ठरवून दिलेल्या प्रती विद्यार्थी १०० ग्रॅम हे प्रमाण जास्तीचे असल्याने त्यांचा साठा हा शिल्लक राहत असल्याचे सबब सांगून त्यामुळेच नमूद गोडावूनवर साठा अतिरिक्त असल्याचे सांगितले. उपस्थितांना सन २००९ पासून विभाग निहाय उचल केलेल्या साठ्याचे तपशिल, विभाग निहाय विद्यार्थांची संख्या, विभाग निहाय खिचडीसाठी वापरण्यात आलेल्या साठ्याचे तपशिल इ. माहिती सादर करण्यास सुचित केले असता सदरची आकडेवारी सह तपशिलवार माहिती तसेच इतर आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०८/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी यांचे वतीने स.पो.नि. श्री. एम. आर. पालांडे यांनी उपस्थित राहून तपासी पोलिस अधिकारी यांचे वाचावे क्र. २० अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने ॲड. मनिषा परांजपे तसेच व्यवस्थापक सुनिलकुमार परती हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. २१ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस तसेच त्याअनुषंगाने दिनांक ०८/०१/२०१३ च्या नोटीसमधील नमूद मसुद्यामध्ये विभागनिहाय वर्क ऑर्डरची प्रत, करारनामा तसेच सन २००९ पासून उचल केलेल्या व उपयोगात आणलेल्या तांदळाच्या साठ्याचे विभागनिहाय तपशिल सादर करण्याच्या सुचना दिल्या असता मिरा-भाईंदर मनपा वगळता बृहन्मुंबई मनपा व ठाणे जिल्हा परिषद येथील वाडा व पालघर विभागाचे वर्क ऑर्डर उपलब्ध नसल्याचे सांगितले. द्विपक्ष करारनाम्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका सोबतचा करारनामा उपलब्ध नसून उर्वरीत विभागाचे करारनामे सादर केल्याचे सांगितले. सदर बाबत उपस्थितांनी वरील नमुद सादर करावयाचे वर्क ऑर्डर व द्विपक्ष करारनाम्याची प्रत तसेच २००९ पासून नोव्हेंबर २०१२ या कालावधीचे विभाग निहाय साठ्याचे उचल व वाटप यांची तपशिलवार आकडेवारी सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली.

मे. वेलवर्थ फुड प्रा.लि., नवी मुंबई या वेअरहाऊसवर तीनही विभागाचा साठा साठवणूक करण्याबाबत परवानगी असल्यास सादर करण्याबाबत सुचित केले असता, उपस्थितांनी १) बृहन्मुंबई मनपा कडील तपासणी नंतरचे परवानगी पत्र सादर केले. २) पालघर विभागाकडील परवानगी पत्रात नवी मुंबई विभागाकरीता सादर केले. ३) वाडा विभागाची परवानगी घेतलेली नाही. ४) मिरा-भाईंदर मनपाच्या परवानगी पत्रात त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... ICE

साठवणूकीस परवानगी असल्याचे नमूद असून त्यामध्ये नवी मुंबई विभाग नमूद नसल्याचे आढळून आले. त्याअनुषंगाने वरील नमूद उपलब्ध परवानगी पत्राच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत.

मिरा-भाईंदर मनपाच्या अधिपत्त्याखालील विद्यार्थ्यांची संख्येबाबत विचारणा केली असता, सदरची आकडेवारी शिक्षण अधिकारी अथवा संबंधित शाळा यांचेकडे उपलब्ध असल्याचे सांगून सदर विभागाकडून देण्यात येणारे धनादेश त्यांची संस्था स्विकारीत असल्याचे सांगितले. त्याबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे पुढील सुनावणीस सादर करणार असल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी मे. अेस इंन्टरनॅशनल, तुर्भे येथे तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा हा मे. गजानन ट्रेडिंग यांचा असल्याचे पंकज ठक्कर यांनी सांगितले. तथापी, सुनावणीच्या वेळी मे. गजानन ट्रेडिंगचे मालक यांनी सदरचा साठा त्यांचा नसल्याचे सांगून तो मे. इस्कॉन फुडस् रिलीफ फाऊंडेशन यांचा असल्याचे सांगितले. याबाबत उपस्थित तपासी पोलिस अधिकारी यांना सखोल तपासाचे आदेश देण्यात आले.

मे. पटेल कोल्ड स्टोरेज व मे. अेस इंन्टरनॅशनल या दोन्ही सोबतच्या साठवणूकीचा करारनामा सादर करण्यास सुचित केले असता, सदरचे करारनामे नसल्याचे सांगितले. तथापी, मे. पटेल कोल्ड स्टोरेज यांच्या अधिपत्त्याखालील मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. यांना अटी व शर्तीबात ई-मेल असल्याचे सांगून सदरची प्रत पुढील सुनावणीस सादर करु असे सांगितले.

मे. मार्केटिंग फेडरेशन यांनी यापूर्वीच्या सुनावणीस सादर केलेल्या निवेदनानुसार त्यांनी मे. इस्कॉन फुडस् रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या नेमून दिलेल्या ठिकाणी साठ्याच्या पुराव्या दाखल सादर केलेल्या वितरण आदेशामध्ये नेमून दिलेल्या विभागाचा पत्ता नमूद असून त्यामध्ये वाशी येथील वेअर हाऊसचा उल्लेख नसल्याची बाब उपस्थितांना निदर्शनास आणून दिली असता मे. मार्केटिंग फेडरेशन यांनीच वाशी येथील वेअर हाऊसमध्ये पुरवठा केल्याचे सांगून सदरच्या अतिरिक्त होणाऱ्या सुमारे ५० ते ६० कि.मी. चे वाहतुकीचे पैसे मे. इस्कॉन फुडस् रिलीफ फाऊंडेशन अदा करीत नसल्याचे सांगितले.

ठाणे जिल्हा परिषदच्या अधिपत्त्याखालील पालघर विभागाकडून नमूद संस्थेस वाशी येथील वेअरहाऊसमध्ये साठवणूकीस परवानगी देतानांच्या नमूद अटी/शर्ती नुसार साठा पुस्तक सादर करण्यास सुचित केले असता सदरचे साठा पुस्तक त्यांचेकडे नसल्याचे सांगून नवी मुंबई येथील मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. या वेअरहाऊसमध्ये मागील एक वर्षापासून साठवणूक करीत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. त्याअनुषंगाने पालघर विभागाचे परवानगी पत्र सन २०१० पासून असल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता सन २०१०-२०११ या

CONTROLLER OF RATIONING

कालावधीत नवी मुंबई परिसरातील इतर वेअरहाऊसमध्ये साठवणूक केले असल्याचे उपस्थितांनी सांगितले. याबाबतचा तपशिल पुढील सुनावणीस सादर करण्याच्या सुचना दिल्या.

वरील नमूद पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी उपस्थितांनी दोन आठवडयांची मुदत मागितली असता सदरचा साठा हा नाशवंत असल्याने तसेच यापुर्वीच्या दोन्ही सुनावणीमध्ये नमूद कागदपत्रे सादर करण्यास पुरेशी संधी दिली असल्याने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी तसेच वरील नमूद कागदपत्रे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १५/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १५/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी यांचे वतीने पोलिस उपनिरिक्षक श्री. एस.जे. काळे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. २२ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने ॲड.. मनिषा परांजपे तसेच व्यवस्थापक सुनिलकुमार परती हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. २३ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. चे व्यवस्थापक (व्यापार) श्री. भुषण खेबुडकर यांनी उपस्थित राहून प्रकरणी तिन्ही विभागाकरिता ते प्राधिकृत वाहतुकदार असल्याचे सांगितले. त्यापैकी मुंबई व मुंबई उपनगर या विभागाकरिता मे. विशाल ट्रान्सपोर्ट तसेच ठाणे जिल्ह्याकरिता मे. साई ट्रेडिंग ॲण्ड मार्केटिंग कंपनी, जळगांव यांना उपवाहतूकदार म्हणून त्यांच्या स्तरावर नेमणूक केली असल्याचे सांगून सदरहू दोन्ही उपवाहतूकदारांनी मे. इस्कॉन फुडस् या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी निर्देशीत केल्यानुसार शासकिय गोदामातून उचल केलेला तांदळाचा साठा हा नियोजित ठिकाणी वितरण न करता वाशी येथील पटेल कोल्ड स्टोरेज या वेअरहाऊसमध्ये कोणताही अतिरिक्त मोबदला न घेता वितरण केल्याचे सांगितले. सदर बाबत श्री. खेबुडकर यांना शासन परिपत्रक, शासन निर्णय तसेच वाहतुकीच्या करारनाम्यामध्ये शासकिय गोदामामधून नमूद संस्थेच्या केंद्रिय स्वंयपाकघरात वितरण करावयाची आवश्यक बाब निदर्शनास आणून दिली असता, सदरच्या तिन्ही विभागापासून अलिप्त असलेल्या वाशी येथील गोदामात वितरण करण्यासाठी संबंधीत प्राधिकरणाची परवानगी घेतली नसल्याची बाब मान्य त्यांनी केली आहे. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी तसेच वरील नमूद पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी अंतीम संधी म्हणून दिनांक २२/०१/२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. चे व्यवस्थापक (व्यापार) श्री. भुषण खेबुडकर हे उपस्थित राहिले. तसेच विशाल ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक श्री. उमेश शिवाजी पवार यांचे वतीने मुखत्यारपत्रधारक म्हणून त्यांचे वडील श्री. शिवाजी लक्ष्मण पवार व श्री साई मार्केटिंग

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ... BAI

ॲन्ड ट्रेडिंग कंपनी, जळगांव या उपवाहतूकदाराच्या वतीने त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री. सुनिल अभिमन्यु सोनवणे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र.२७ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली.

मे. विशाल ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक यांनी सदर तांदळाचा साठा मे. इस्कॉन फुडस् या संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितल्यानुसार वाशी येथील नमूद वेअरहाऊसवर वितरण केल्याचे सांगून सदर वितरणाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका यांची परवानगी घेतली नसल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी, मे. महाराष्ट्र मार्केटिंगचे व्यवस्थापक यांनी यापूर्वीच्या सुनावणीमध्ये त्यांच्या अधिपत्याखालील वाहतुकदारांनी वाशी येथील वेअरहाऊसवर वितरण केल्याचे सांगितले. तथापी, मे. श्री साई मार्केटिंग ॲन्ड ट्रेडिंग कंपनी यांच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधी यांनी सुनावणीस उपस्थित राहून सदर वाहतुकीकरिता त्यांनी त्यांच्या स्तरावर परस्पर मे. ए.बी. पाटील ॲन्ड सन्स या उपवाहतुकदारास नेमल्याचे सांगितले. परंतू मे. श्री साई मार्केटिंग ॲन्ड ट्रेडिंग कंपनी यांनी सादर केलेल्या निवेदनात; मे. ए.बी. पाटील ॲन्ड सन्स या वाहतुकदाराचे मे. इस्कॉन फुडस् या संस्थेच्या नियोजीत ठिकाणी वितरण केल्याचे नमूद केले असून तेथून मे. इस्कॉन फुडस् या संस्थेनी वाशी येथील गोदामात साठा स्थलांतरीत केल्याचे सांगितले. तथापी, मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. व मे. इस्कॉन फुडस् या दोन्ही संस्थेच्या प्रतिनिधीनी नमूद वाहतुकदाराने वाशी येथे वितरण केल्याचे सांगितले आहे. या सर्व बाबी साशंकता निर्माण करण्याऱ्या आहेत. मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. व्यवस्थापक यांनी त्यांच्या करारनाम्यामध्ये उपवाहतुकदार नेमणूक करण्याची बाब नमुद नसल्याचे सांगून सदरचा निर्णय त्यांनी त्यांच्या स्तरावर घेतल्याचे सांगितले.

सबब, मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. तसेच मे. साई ट्रेडिंग ॲण्ड मार्केटिंग व मे. ए.बी. पाटील ॲन्ड सन्स या दोन्ही वाहतुकदारांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी तसेच वरील नमूद पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक २९/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या अंतीम सुनावणीस श्री. अे.डी. माने, पोलिस उपनिरिक्षक यांनी तपासी पोलिस अधिकारी यांचे वतीने उपस्थित राहून वाचावे क्र. २९ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. चे व्यवस्थापक (व्यापार) श्री. भुषण खेबुडकर, श्री साई मार्केटिंग ॲन्ड ट्रेडिंग कंपनी व मे. अे.बी. पाटील ॲन्ड सन्सचे मालक अनिल बाळकृष्ण पाटील हे उपस्थित राहिले. सदर सुनावणीस उपस्थित मे. अे.बी. पाटील ॲन्ड सन्सचे मालक अनिल बाळकृष्ण पाटील यांनी सदरचा तांदळाचा साठा मे. इस्कॉन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी निर्देशित केल्यानुसार वाडा व पालघर विभागाचा साठा त्यांनी वाशी येथील मे. पटेल कोल्ड स्टोअरेज, वाशी येथे वितरण केल्याचे तसेच मिरा-भाईंदर विभागाचा तांदळाचा साठा हा

CONTROLLER OF RATIO

संबंधीत शाळांना वितरण केल्याचे सांगितले. सदर बाबत मे. अे.बी. पाटील ॲन्ड सन्सचे मालक अनिल बाळकृष्ण पाटील यांचा वाचावे क्र. ३० अन्वये लेखी जबाब नोंदविण्यात आला आहे. 013

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक म्हणून उपस्थित इसम नामे अशोक परशुराम तुपे यांनी ते दहिवली, तालुका कर्जत येथील गजानन ट्रेडिंग कंपनी ही आस्थापना त्यांची प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे संदरचा व्यवसाय सन २००९ साली संपूर्णपणे बंद केला असल्याचे सांगितले. मे. अेस इंटरनॅशनल येथील जप्त तांदळाच्या साठ्याबाबत त्यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगून सदर साठ्याकरिता गजानन ट्रेडिंग कंपनीच्या नावे बोगस बिल बुक छापून त्याद्वारे कानजीभाई या व्यक्तीने पंकज ठक्कर याच्या साथीने सदरचा गैरव्यवहार केला असल्याचे सांगितले. मे. अेस इंटरनॅशनल येथे साठवणूक असलेला तांदळाच्या साठ्याबाबत कानजीभाई याच्याकडे त्यांनी विचारणा केली असता, कानजीभाई यांनी पंकज ठक्कर यांचेशी संगणमत करुन मे. अेस इंटरनॅशनल या वेअरहाऊसमध्ये जप्त असलेला तांदळाचा साठा हा शालेय पोषण आहार योजनेचा असून तो त्यांनी मे. पटेल वेअरहाऊस येथील साठा इस्कॉन फुड या संस्थेचे व्यवस्थापक श्री. परती यांचेकडून काळाबाजारीने खरेदी केल्याचे सांगितले. सदरचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे भासविण्यासाठी गजानन ट्रेडिंग कंपनी या नावाचे खोटे पावती पुस्तक छापून गैरवापर केल्याचे कानजीभाई याने कबूल केल्याचे सांगितले आहे. सदर बाबत अशोक परशुराम तुपे यांचा लेखी जबाब सुनावणी दरम्यान नोंदविण्यात आला आहे. सुनावणी दरम्यान उपस्थित मे. अेस इंटरनॅशनलचे मालक पंकज ठक्कर व त्याचा साथीदार कानजीभाई हे न सांगता कार्यालय सोडून निघून गेले.

सबब, सदर प्रकरणी केलेल्या तपासामध्ये सदर कागदपत्रांचा समाविष्ठ करुन त्याअनुषंगाने सखोल चौकशी करण्यात यावी व सदर गुन्ह्यामध्ये पंकज ठक्कर यांचा साथीदार कानजीभाई या इसमास सहआरोपी करुन घेण्यात यावे. प्रस्तूत प्रकरणातील यापुढील काळातील तपासाचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा जेणेकरुन जप्त मुद्देमालाचे विल्हेवाटीचे आदेश पारीत करणे सुलभ होईल, असे या कार्यालयाचे पत्र क्र. शिशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७५/२०१२/जा.९१८, दिनांक १९/१२/२०१२ ची प्रत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आली आहे.

पोलिस निरिक्षक (गुन्हे), तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी दिनांक २१/०१/२०१३ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार, सदर गुन्ह्यात श्री गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक श्री. अशोक परशुराम तुपे यांचेकडे दिनांक १५/०१/२०१३ रोजी पुन्हा पोलिस ठाणेस बोलावून त्याचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक चौकशी केली असता, त्याने सांगितले की, त्याचे मालकीची श्री गजानन ट्रेडिंग कंपनी ही त्याने सन २००९ पासून बंद केलेली आहे. त्यामुळे

त्याचा सन २००९ पासून सदर कंपनीच्या कोणत्याही मालाच्या खरेदी विक्रीच्याबाबत संबंध राहिलेला नाही. तसेच गुन्ह्यातील त्याचे कंपनीचे नावे असलेला एकूण २५६० तांदळाच्या गोण्या त्यामध्ये ५० किलो व १०० किलो वजनाचा माल हा कांजी बंच्चू रावरीया याने त्याचे कंपनीचे लेटर पॅड तयार करुन तो माल त्या लेटर पॅडद्वारे अेस इंटरनॅशनल कंपनी येथे साफसफाई करण्यासाठी पाठविला आहे, असे नमूद आहे. सदरच्या मालाशी त्याचा काहीएक संबंध नाही. सदरचा तांदूळ हा कानजीभाई बंच्चू रावरीया व पंकज ठक्कर यांनी मिळून शालेय पोषण आहार योजनेचा मे. पटेल वेअर हाऊस येथील ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. तसेच सदरचा जप्त केलेला तांदळाचा साठा हा खुल्या बाजारामधील भासविण्यासाठी त्याचे कंपनीच्या नावाचे खोटे पावती पुस्तक छापून कानजीभाई रावरीया व अेस इंटरनॅशनचे मालक पंकज ठक्कर यांनी सदर मालाचा गैरवापर केलेला आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल व झाले व्यवहाराशी त्याचा काहीएक संबंध नाही. त्याने यापुर्वी दिनांक ०५/११/२०१२ रोजी दिलेला जबाब हा कानजीभाई हा त्याचेकडे यापूर्वी नोकरी करीत होता. त्यामुळे त्याचेवर विश्वास ठेऊन त्याचे सांगणेप्रमाणे दिला होता. सदरचा जबाब चुकीचा आहे. अशा प्रकारची हकीकत सांगितल्याने त्याचा सविस्तर जबाब नोंद करुन मुळ कागदपत्रात सामील करण्यात आलेला आहे. त्यानंतर सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे कानजीभाई बंच्चू पटेल उर्फ रावरीया याचा शोध घेऊन त्यास दिनांक १६/०१/२०१३ रोजी अटक करुन त्याचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक विचारपुस केली असता, त्यानेही अशोक परशुराम तुपे यांचेसारखी मिळतीजुळती हकीकत सांगून पंकज ठक्कर यांनी सदरचा माल हा मे. पटेल वेअरहाऊस नेरुळ येथील असून ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. सदरचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे भासविण्यासाठी गजानन ट्रेडिंग कंपनी याचे बनावट लेटर पॅड वापरुन व दाहोद गुजरात येथील सनवालीया ट्रेडिंग कंपनी येथून खरेदी केल्याची बनावट बिले आणून पंकज ठक्कर यांचेशी संगणमत करुन आणले असल्याचे कानजीभाई याने कबूल केलेले आहे. एंकदरीत झाले तपासामध्ये नमुद अटक आरोपीतांनी आपसात संगणमत करुन सदरचा जप्त मुद्देमाल हा दाहोद गुजरात येथून गजानन ट्रेडिंग कंपनी कर्जत यांनी खरेदी केल्याचे दाखवून त्याची बनावट बिले व गजानन ट्रेडिंग कंपनी कर्जत ही सन २००९ मध्ये बंद झाली असतानाही त्याचे बनावट लेटर पॅड वापरुन घटनास्थळी आणून ठेवल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे सदर गुन्ह्यामध्ये भादवि कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ हे कलम दिनांक १७/०१/२०१३ रोजी वाढविण्यात आलेले आहे, असे नमूद आहे.

या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७५/२०१२/जा.९१८, दिनांक १९/१२/२०१२ ची प्रत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना यापूर्वीच अवगत करण्यात आले असून सदर बाबतचा

त्यांचा अहवाल या कार्यालयास आजमितीस अप्राप्त आहे. तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी सादर केलेल्या वरील अहवालानुसार मे. अेस इंटरनॅशनल या गोदामातील तांदळाचा साठा हा संबंधितांनी मे. पटेल कोल्ड स्टोरेज येथील शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत असलेला तांदळाचा साठा मे. इस्कॉन फुडचे व्यवस्थापक सुनिल परती यांचेकडून अवैधरित्या खरेदी केल्याचे सिध्द झाले आहे. सबब, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेकडील गुन्हा नोंद प्रकरण हाताळणारे तपासी पोलिस अधिकारी यांना पुढील तपासाकरिता योग्य सुचना देण्यात येण्याबाबत व सदर गुन्ह्यामधील आरोपी यांनी शालेय विद्यार्थांसाठी वितरीत करावयाचा अनुदानित तांदळाच्या साठ्याची काळाबाजार केल्याचे सिध्द होत असल्याने, सदर गुन्ह्यामधील आरोपीतांविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम वाढविण्यात येण्याबाबत व तसा पुढील तपासाचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्याबाबत वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना वाचावे क्र. ३२ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

तद्नंतर पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी वाचावे क्र. ३३ अन्वये सादर केलेल्या अहवालात सदर गुन्हा नोंद प्रकरणी केलेल्या पुढील तपासामध्ये संबंधितांविरुद्ध भारतीय दंड विधानचे कलम ४०६ व ४२० वाढविण्यात आल्याचे नमूद केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद</u> :-**

पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजीचे अभिवेदनात, यातील अटक आरोपी शकील इस्माईल पटेल व इमरान फारुख पटेल यांचे वेलवर्थ फुड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., नवी मुंबई मध्ये यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांनी शालेय पोषण आहारा करीता इस्कॉन फुड फाऊंडेशन रिलीफ कंपनीस शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेला तांदूळ साठा करुन ठेवल्याने सदरचा गुन्हा दाखल आहे. यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांचे एस्कॉन फुड फाऊंडेशन रिलीफ कंपनीकडे सदर गुन्ह्यातील साठवणूक केलेल्या शालेय पोषण आहाराचा तांदूळ किती उपलब्ध करुन देण्यात आला व किती तांदूळ जुन २०१२ ते गुन्हा दाखल होई पावेतो वापरण्यात आला याबाबत तपास करण्यात आला असून शासनाकडून उपलबध करण्यात आलेला तांदूळाच्या पावत्या प्राप्त करण्यात आला आहे. यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांचा जबाब नोंदविण्यात आला असून त्यांना शासनामार्फत प्राप्त झालेला तांदूळा पैकी शिल्लक राहिलेला तांदूळ कोल्ड स्टोरेजमध्ये साठा करुन ठेवल्याचे सांगितले आहे. यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांनी सादर केलेल्या माहितीची खात्री करण्याकरीता संबंधितांना शासनाकडून किती तांदूळ उपलब्ध करुन देण्यात

आलेला आहे याची माहिती मिळण्याकरिता तांदुळाची १) मा. आयुक्त म.न.पा. बृहन्मुंबई, २) आयुक्त म.न.पा. मिरारोड, ३) जिल्हाधिकारी ठाणे यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला असून त्यांचेकडून अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. नमूद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांनी एम.आय.डी.सी. नवी मुंबई परिसरातील फ्लेमींगो फुड प्रोडक्ट (विची ॲग्रो), ग्लोबल सीडस् ॲन्ड स्पाईसेस, अेस इंटरप्रायझेस या कंपन्यांमध्ये क्लिनींग करीता वेळोवेळी पाठविल्याचे व क्लिनींग करण्यात आलेला तांदूळ स्वच्छ झाल्यानंतर त्याचे प्रत्येकी ५० किलोचे बाचके तयार करुन ते ताडदेव, मिरारोड, पालघर, वाडा येथील केंद्रीय स्वयंपाक घरात पाठविल्याचे सांगत आहे. नमूद गुन्ह्यातील शालेय पोषण आहारा करीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तांदुळापैकी शिल्लक तांदुळाचा साठा वेलवर्थ फुड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी. करुन ठेवल्याचे व फ्लेमींगो फुड प्रोडक्ट (विची ॲग्रो), ग्लोबल सीडस् ॲन्ड स्पाईसेस, अेस इंटरप्रायझेस या कंपनीमध्ये सदरचा तांदुळ स्वच्छ करण्यासाठी पाठविला जात असल्याचे तपासात आढळून आले आहे. नमूद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांनी तपासात दिलेली माहिती तसेच त्यांना शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला तांदूळ याबाबत, १) मा. आयुक्त म.न.पा. बृहन्मुंबई, २) आयुक्त म.न.पा. मिरारोड, ३) जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून उपलब्ध करण्यात आलेला तांदूळ, खर्च करण्यात आलेला तांदूळ व शिल्लक असलेल्या तांदुळाची टॅली करणे बाकी आहे. सदर गुन्ह्यातील जप्त तांदुळ हा नाशवंत असल्याने व तो जास्त दिवस कोल्डस्टोरेजमध्ये पडून राहिल्यास खराब होण्याची शक्यता असल्याने सदरचा जप्त तांदूळ सद्यस्थितीत शासन जमा करणे बाबत आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. चे व्यवस्थापक (व्यापार) श्री. भुषण खेबुडकर यांनी सादर केलेल्या निवेदनात, राज्यांतील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत ६ शैक्षणिक विभागांमधील इयत्ता १ ली ते ५ वी तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आहारासाठी आवश्यक तांदुळाची वाहतुक करणे व अन्नधान्य पुरवठा करणेकरिता संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे पत्र दि.०१.११.२०११ अन्वये महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि. या त्यांचे संस्थेची नियुक्ती केलेली आहे. सदर पत्राची छायाप्रत आपणाकडे सादर करीत आहोत. यापैकी मुंबई शहरातील व ठाणे ग्रामीण भागातील काही शाळांना आहार पुरवठा करण्याचे कामकाज हे इस्कॉन फुड फॉऊंडेशन या संस्थेमार्फत केले जाते. मुंबई महानगरपालिका व शिक्षण अधिकारी, ठाणे यांचे सुचनेप्रमाणे व मागणीप्रमाणे महासंघाने अन्न महामंडळाचे गोदामांमधून तांदुळाची उचल करुन ती इस्कॉन फुड फॉऊंडेशन यांचे गोदामापर्यंत वाहतुक केलेली आहे. माहे एप्रिल, २०१२ ते ऑक्टोबर, २०१२ पर्यंत उचल व पोहोच केलेल्या तांदळाच्या

एफ.सी.आय. ची चलने व महासंघाच्या माहेवार पोहोच पावत्या, त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिका व गट शिक्षण अधिकारी, ठाणे यांनी या तांदुळाकरिता दिलेल्या मागणीची प्रतही आपणाकडे सादर करीत आहोत. आपल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर मार्केटिंग फेडरेशन लि. या त्यांच्या संस्थेबाबत कोणताही उल्लेख नाही. तरीही या कामकाजाचे संदर्भात त्यांचे संस्थेची कोणती भूमिका व काय सहभाग आहे, याबाबतची माहिती वरीलप्रमणे आपणाकडे सादर करीत आहोत. महासंघाने शासनाच्या सूचनेप्रमाणे सदर तांदुळाच्या वाहतुकीचे कामकाज़ केलेले आहे, असे नमूद आहे.

मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या विनंती अर्जामध्ये, त्यांना सदर गुन्हा नोंद प्रकरणी आवश्यक कागदपत्रे व अभिलेख याची पडताळणी करावयाची असल्याने त्यांनी ४ आठवडयाची मुदत मागून पुढील सुनावणीची विनंती केली.

मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. यांचे वतीने ॲड. श्री. पी.अे. पोळ यांचे दिनांक ०१/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांच्या अशिलाने शासकीय साठ्याची साठेबाजी करुन इस्कॉन फाऊंडेशन व अेस इंटरनॅशनल यांच्या सोबत संगणमत करुन गुन्हा केल्याची बाब ते नाकारत आहेत. त्यांचे अशिल मागील १५ वर्षापासून कोल्ड स्टोरेजचा व्यवसाय करीत असून त्याकरिता संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक परवाने प्राप्त करुन घेतले आहेत. सदर प्रकरणी साठ्याची आवक व वितरणाचे तपशिल पुरावादर्शक कागदपत्रांसह त्यांचेकडे उपलब्ध आहे. त्यांच्या अशिलाचे गोदाम सिलबंद असल्याने त्यांचा व्यवसाय ठप्प झालेला आहे. त्यामुळे सदरचे गोदाम सिलमुक्त करण्याची विनंती केलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे दिनांक ०४/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, शालेय पोषण आहार योजने अंतर्गत पालघर गटातील विद्यार्थ्यांना इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशन या संस्थेमार्फत गेली ६ वर्षापासून मध्यान्ह भोजन वाटप करण्यात येते. सदर संस्थेकडून विद्यार्थ्यांना मिळणारा आहार सात्वीक चांगल्या दर्जाचा असून सदर संस्था सेवाभावी वृत्तीने सदरचे काम करीत असल्याचे वेळोवेळी जिल्हा परिषदेच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी खात्री केलेली आहे. सदर संस्थेने तुर्भे येथील तांदूळाच्या गोडावूनला आपल्या पथकाने सिल केले असल्याचे दि.२२.११.२०१२ अन्वये सदर संस्थेने कळविले आहे. सदरचा तांदूळ सिल झाल्यामुळे संस्थेने पालघर गटातील शालेय विद्यार्थ्यांना अन्न शिजवून देण्यास असमर्थता दाखविली आहे. त्यामुळे पालघर गटातील शालेय विद्यार्थी मध्यान्ह भोजनापासून वंचित राहिल्यास व योजनेवर विपरीत परिमाण झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल, असे नमूद आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे दिनांक १४/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेवर केंद्र व राज्य असा अनुक्रमे ७५% व २५% असा खर्च केला जातो. या योजनेसाठी भारत सरकारकडून थेट तांदूळाचे नियतन राज्याला मंजूर केले जाते. राज्य शासनाला मंजूर केलेल्या नियतनातून शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे हे राज्यातील जिल्ह्यांना पटसंख्येच्या प्रमाणात व वार्षिक कार्ययोजनेनुसार तांदुळ मंजूर करतात. या मंजूर तांदुळामधून जिल्ह्यातील गट/मनपा/नप व माध्यमिक विभागास तांदळाचे नियतन मंजूर करण्याचे काम जिल्हा परिषदेचे आहे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन ही संस्था पालघर गटात गेली ६ वर्षापासून अत्याधुनीक यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना अन्न शिजवून वाटप करीत आहेत. सदर संस्था विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार पुरवित असून याबाबत तालुका व जिल्हा स्तरावरील अधिकारी व पदाधिकारी यांनी संस्थेस भेटी देऊन तपासणी केलेली आहे. जिल्ह्यातील पालघर व वाडा गटातील सर्व शाळांना अन्न शिजवून देण्याचे काम संस्था करीत असून मनपा मिराभाईंदर क्षेत्रातील काही शाळांना अन्न शिजवून देण्याचे काम संस्था करीत आहे. संस्थेस प्राप्त झालेला तांदूळ साफसफाई साठी नवी मुंबई येथे पाठविण्याबाबत संस्थेने इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन ही संस्थेस दिनांक १४/०९/२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने संस्थेस त्यांचे कार्यालयाचे दिनांक २३/०९/२०१० व २४/०९/२०१० च्या पत्रान्वये तांदूळ साफसफाईसाठी नवी मुंबई येथे पाठविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. संदरची परवानगी देताना संस्थेने साफसफाईसाठी पाठविण्यात आलेला तांदूळ परीमाणासह साठा नोंदवहीत नोंदवण्याचे तसेच साफसफाई होऊन संस्थेच्या किचन शेडमध्ये प्राप्त झालेला तांदूळ परिमाणासह नोंदविण्याचे संस्थेस कळविण्यात आले आहे. तांदूळ साफसफाईसाठी ठेवण्यात आलेल्या तांदूळाबाबत इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने पटेल कोल्ड स्टोरेज वेलवर्थफुड प्रा.लि. डी-३६-१ तुर्भे, जि. ठाणेचे संचालक इमरान फारुक पटेल यांचेशी दि.२०.०९.२०११ अन्वये पत्रव्यवहार केलेला आहे. या प्रकरणी आपल्याकडील पत्र क्र. निशि/परवाना/०९/का.वि.५४२०/६-अ/जा.८८ दि.१०/०२/२०१० ची प्रत सोबत जोडलेली असून त्याचे अवलोकन व्हावे. सदर पत्रामध्ये आपल्या कार्यालयाकडून इस्कॉन या संस्थेस रॉ तांदूळ संबंधित वाशी येथील गोदामात साठा करण्यास तसेच तो तेथून क्लिनिंग एजंटकडे पाठवून सफाई झालेला तांदूळ संबंधित गटास पाठविणेबाबत सदर पत्रात स्पष्टता केलेली आहे. असे असतानाही आपल्याकडील रेशनिंग पथकाने सदर संस्थेचा पटेल स्टोअरेज, तुर्भे येथील तांदूळ सिल करुन नेरुळ पोलिस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र. ३०४१ दि.०३/११/२०१२ अन्वये तांदूळ विनापरवाना साठवणूक केल्याबद्दल व केंद्रिय स्वयंपाक गृहाची जागा ही साठवणूक केलेल्या गोदामापासून लांब असल्यामुळे सदरच्या तांदूळाचा काळाबाजार करण्याच्या उद्देशाने गुन्हा दाखल केल्याचे शिक्षण संचालक स्तरावरील चौकशी नुसार समजते. सदरचा तांदूळ सिल झाल्यामुळे इस्कॉन फुड रिलीफ

फाऊंडेशन शाखा व्यवस्थापक पालघर यांचे कडील दि.२२/११/२०१२ चे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यानुसार संस्थेस पालघर गटासाठी दररोज २३५० किलो ग्रॅम एवढा तांदूळ अन्न शिजवून देण्यासाठी लागत असल्यामुळे एवढा जास्त तांदूळ मानवी श्रमाने (Manualy) साफ करणे शक्य नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदरचा तांदूळ हा स्वयंचलीत यंत्रांच्या सहाय्याने साफ करुन घेण्यासाठी बाहेर पाठविणे आवश्यक आहे व अशी सुविधा पालघर गटात नसुन वाशी नवी मुंबई येथे उपलब्ध आहे. सदरचा तांदूळ सिल झाल्यामुळे संस्थेस जोपर्यंत सिल झालेला तांदूळ संस्थेच्या ताब्यात मिळत नाही व संस्थेच्या विरुध्द केलेली केस आपणाकडून परत घेण्यात येत नाही तोपर्यंत संस्था पालघर गटात अन्न शिजवून देण्यास तयार नाही. शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना दररोज अन्न शिजवून देणे बंधनकारक असून या प्रकरणी आपल्या पथकाने केलेली कारवाई ही जिल्हा स्तरावर अवगत केलेली नाही. यापूर्वीही त्यांच्या कार्यालयाचे दिनांक ०६/०९/२०१२ रोजीच्या पत्रान्वये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत भिवंडी ते वाडा येथील महाराष्ट्र कन्झ्युमर फेडरेशन कडील तांदूळाच्या गाड्या रेशनिंग पथकातील अधिकाऱ्यांनी अडवणूक केल्या बाबत आपणास सविस्तर कळविले होते. त्यानूसार आपण शालेय पोषाण आहार योजने अंतर्गत कारवाई करताना आवश्यकती काळजी घेण्याची सुचना आपल्या स्तरावरुन संबंधितांना देण्याबाबत कळविले होते. तथापी, या प्रकरणी आपल्या कार्यालयाकडून योग्य ते सहकार्य न मिळता उलट आपल्याकडील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून योजना अंमलबजावणीमध्ये अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. तरी सदर प्रकरणी आपल्या कडील केलेल्या कारवाईमुळे विद्यार्थी योजनेपासुन वंचित राहिले आहेत अथवा योजना अंमलबजावणी करताना कोणताही अडथळा निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी त्यांच्या कार्यालयाची राहणार नाही, असे नमूद आहे.

पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे अभिवेदनात, नमूद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांनी तपासात दिलेली माहिती तसेच त्यांना शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला तांदूळ याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून उपलब्ध करण्यात आलेला तांदूळ, खर्च करण्यात आलेला तांदूळ व शिल्लक असलेल्या तांदुळाची टॅली करणे बाकी आहे. यातील वेलवर्थ फुड प्रा.लि., डी. ३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी. या कोल्डस्टोरेजचे सिल आपले आदेशानुसार काढण्यात आले आहे. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. नमूद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती याने ॲन्टीसेपटरी बेल मिळणे कामी मा. सत्र न्यायालय, ठाणे येथे अर्ज दाखल केलेला असून त्याची पुढील सुनावणी दिनांक १९.१२.२०१२ रोजी ठेवण्यात आलेली आहे. नमूद गुन्ह्यातील जप्त तांदुळ हा नाशवंत असल्याने व

तो जास्त दिवस कोल्डस्टोरेजमध्ये पडून राहिल्यास खराब होण्याची शक्यता असल्याने सदरचा जप्त तांदूळ सद्यस्थितीत शासन जमा करणे बाबत आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा अॅन्ड कंपनी, अॅड. अॅन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे निवेदनात, मे. इस्कॉन या संस्थेस संबंधित प्राधिकरणाकडून तांदळाचा विनामुल्य पुरवठा करण्यात येतो. माहे नोव्हेंबर, २०११ पूर्वी नमूद संस्थेने भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून तांदळाच्या साठ्याची उचल केली आहे. तद्नंतरच्या कालावधीकरिता महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर मार्केटिंग फेडरेशन हे वाहतूकदार बोरीवली व भिवंडी येथील गोदामातून संस्थेच्या आवारात तांदळाच्या पुरवठ्याकरीता करारबध्द आहे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत लाभार्थ्यी विद्यार्थ्यांकरीत मध्यान्ह भोजन तयार करते वेळी संस्थेच्या वतीने त्यामध्ये डाळ, घी व इतर मसाले पदार्थ जेवण स्वाधीष्ट बनविण्याकरीता वापर करीत आहेत. तांदळाचा साठा हा आवश्यकतेपेक्षा जास्त आहे. सदर बाब संबंधित प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. संस्थने दिनांक १०/१२/२००९ च्या पत्रान्वये वाशी येथे साठवणूक व वाहतूकीसाठी परवानगी मागितली आहे. नमूद वेअरहाऊसमधून तांदळाचा साठा साफसफाईकरीता क्लिनिंग एजंट यांचेकडे पाठविण्याची बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. दिनांक १६/०४/२०१० रोजी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पत्र निर्गमित करुन प्राप्त तांदळाचा साठा हा अतिरिक्त होत असल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. सदर बाबत आजमितीस त्यांच्याकडून उत्तर प्राप्त झालेले नाही. तद्नंतर दिनांक १८/०५/२०१० रोजी पुन्हा पत्र निर्गमित करुन निदर्शनास आणून दिले व दिनांक २०/०८/२०१० रोजी सहाय्यक महानगरपालिका आयुक्त यांना पत्र निर्गमित करुन तांदळाचा पुरवठा थांबविण्याबाबत विनंती केली. तथापी, त्यांच्याकडून अतिरिक्त तांदळाचा पुरवठा सुरु राहिल्याने संस्थेस सदरचा अतिरिक्त साठा हा नवी मुंबई येथील वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याशिवाय पर्याय राहिला नाही. भारतीय खाद्य निगम यांच्या गोदामातून प्राप्त झालेला तांदळाचा साठा हा विना सफाईचा तसेच कचरायुक्त असल्याने व बारदाणाच्या गोण्या हे बहुतांश वेळी फाटले असल्याने साठ्याची नासाडी होत आहे. त्यामुळे सदर अवस्थेत थेट केंद्रिय स्वंयपाकघरात पुरवठा करण्याऐवजी तो साठा साफसफाईच्या प्रक्रियेसाठी क्लिनिंग युनिटमध्ये पाठविण्याशिवाय पर्याय नाही. संस्थेस ताडदेव, मिरा-भाईंदर, पालघर व वाडा या विभागातील शाळा संलग्न असून नमूद विभागातील ४ स्वंयपाकघराजवळ क्लिनिंग युनिट उपलब्ध नसल्याने त्यांनी साफसफाईच्या प्रक्रियेसाठी नवी मुंबई येथील एस इंटरनॅशनल, विचि अॅग्रो प्रोडक्टस् प्रा.लि., फ्लेमिंगो व ग्लोबल या ठिकाणी साफसफाई करीता तांदळाचा साठा पाठविला आहे. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणारा तांदळाचा साठा हा अतिरिक्त होत असल्याची बाब त्यांनी संबंधित प्राधिकरण्याच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. संस्थेचा सदर

CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

0021

कामात कोणताही दुर्भाव दृष्टीकोन नाही. नमूद संस्था एक चांगल्या प्रकारचे सामाजिक कार्य करण्यासाठी मध्यान्ह भोजन पुरवठा करण्याचे काम करीत आहे. संस्थेचे कर्मचारी अथवा इतर संबंधित हे कोणत्याही अवैध प्रक्रियेशी संबंधित नाही. सदर योजने अंतर्गत प्राप्त झालेला तांदळाचा साठा हा अेस इंटरनॅशनल येथे साफसफाईची प्रक्रिया पूर्ण करुन तद्नंतर ४ केंद्रीय स्वंयपाकघरात पुरवठा करण्यात येतो. या व्यतिरिक्त त्यांच्या संस्थेचा अेस इंटरनॅशनल अथवा त्यांच्या वतीने होणाऱ्या इतर गतिविधीमध्ये कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. इस्कॉन फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने ताडदेव, मिरा-भाईंदर, पालघर व वाडा या विभागाअंतर्गत असलेल्या १४६२ शाळांमधील सुमारे १७१७९६ विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनचा पुरवठा करीत आहे. अेस इंटरनॅशनल या क्लिनिंग युनिटमधून तांदळाच्या साठ्याची फेरविक्री केली जात असल्याची बाब आपल्या अधिकाऱ्यांच्या प्रथमदर्शनी निदर्शनास आली. ही आश्चर्यजनक बाब असून त्यांच्या संस्थेचा अेस इंटरनॅशनल अथवा त्यांच्या व्यवस्थापनाकडून केल्या जाणाऱ्या कोणत्याही गतिविधीमध्ये इस्कॉन या संस्थेचा काहीही संबंध नाही. तांदळाचा साठा प्राप्त झाल्यानंतर त्याची साफसफाई केली जाते व साफसफाई केल्यानंतर त्याचे वजनामध्ये कमतरता येते. त्यामुळे अेस इंटरनॅशनल येथे कोणतीही बेकायदेशिर प्रक्रिया सुरु असल्याबाबत साशंकता आहे. इस्कॉन फाऊंडेशन या संस्थेने तांदळाच्या साठ्यामध्ये गैरव्यवहार केल्याची बाब त्यांना मान्य नसून अतिरिक्त साठा होत असल्याची बाब संबंधित प्राधिकरणास वारंवार निदर्शनास आणून देण्यात आली आहे. उपरोक्त निवेदन लक्षात घेऊन नमूद संस्थेने कोणत्याही नियमांचा भंग केलेला नाही. अथवा गुन्हा केलेला नसल्याने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येऊ नये, असे नमूद केले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे दिनांक २८/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, पालघर विभागातील ४५० शाळांमधील इयत्ता पहिली ते पाचवीतील विद्यार्थ्यांची पटसंख्या ३४६७२ व ९४ शाळांमधील इयत्ता सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांची पटसंख्या १६३५६ आहे. वाडा विभागातील ३१३ शाळांमधील इयत्ता पहिली ते पाचवीतील विद्यार्थ्यांची पटसंख्या १९०९६ व ७९ शाळांमधील इयत्ता सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांची पटसंख्या ८३८४ आहे. म.न.पा. मिरा-भाईंदर विभागातील ४२ शाळांमधील इयत्ता पहिली ते पाचवीतील विद्यार्थ्यांची पटसंख्या ८७०१ व २५ शाळांमधील इयत्ता सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांची पटसंख्या २६७१ असल्याचे नमूद आहे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०१२-१३ या सालाकरीता इस्कॉन या संस्थेस संलग्न असलेल्या शाळांकरीता मंजूर नियतन पुढील प्रमाणे आहे. माहे एप्रिल, २०१२ ते ऑक्टोबर, २०१२ या कालावधीमध्ये पालघर विभागाकरीता एकूण ६५०५ क्विंटल, वाडा विभागाकरीता एकूण २६९० क्विंटल तसेच मिरा-भाईंदर विभागाकरीता ११४५.५ क्विंटल असे मिळून एकूण १०३४०.५ क्विंटल असल्याचे नमूद आहे.

शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ०२/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, शालेय पोषण आहार योजने अंतर्गत मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे २६४ महापालिका व खाजगी अनुदानीत शाळेतील सुमारे ९०००० विद्यार्थ्यांना शिजविलेल्या आहाराचे वाटप करण्यात येते. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेला माहे जुन, २०१२ ते ऑक्टोबर, २०१२ या कालावधीत देण्यात आलेला तांदूळ आणि मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेमार्फत माहे जुन, २०१२ ते ऑक्टोबर, २०१२ या कालावधीत वापरलेल्या तांदूळाची माहिती पुढील प्रमाणे आहे. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना माहे जुलै-ऑगस्ट २०१२ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वी करीता १९२१ क्विंटल व इयत्ता ६ वी ते ८ वी करीता २२५०.५० क्विंटल, माहे सप्टेंबर २०१२ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वी करीता ५६५.५० व इयत्ता ६ वी ते ८ वी करीता ७०३.५० क्विंटल तसेच माहे ऑक्टोबर २०१२ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वी करीता ९८१ क्विंटल व इयत्ता ६ वी ते ८ वी करीता ११५५.५० क्विंटल असे मिळून माहे जुलै ते ऑक्टोबर २०१२ या कालावधीमध्ये एकूण ७५७७ क्विंटल तांदळाचा साठा देण्यात आला आहे. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने नमूद कालावधीमध्ये एकूण ६७४३.१५ क्विंटल तांदळाचा साठा वापरण्यात आल्याचे नमूद आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शालेय पोषण आहार योजने अंतर्गत मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना मे. पटेल कोल्ड स्टोअरेजच्या अधिपत्याखालील मे. वेलवर्थ फुड प्रा. लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., जिल्हा ठाणे या ठिकाणच्या वेअरहाऊसमध्ये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदूळाच्या साठवणूकीस कोणत्याही प्रकारची परवानगी दिलेली नाही. अशाप्रकारे कोणतेही पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना देण्यात आलेले नाही. तसेच अशाप्रकारची कोणतेही शासन निर्णय किंवा परिपत्रके या कार्यालयात उपलब्ध नाहीत. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना अनुज्ञेय असलेला तांदूळ त्यांच्या १९, जयवंत इंडस्ट्रीयल इस्टेट, ६३, ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४ येथील स्वयंपाकगृहापर्यंत वाहतूक करण्याचे आदेश शासनाने नियुक्त केलेल्या कंत्राटदारास देण्यात येतात. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना देण्यात आलेला तांदूळ वाहतूकदाराने नियोजित ठिकाणी न करता कार्यक्षेत्रा बाहेरील वेअरहाऊसवर कसे केले याबाबत वाहतूकदाराकडून अभिप्राय मागविणे योग्य होईल. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने शालेय पोषण आहार योजने अंतर्गत देण्यात आलेल्या तांदूळाची साठवणूक मे. पटेल कोल्ड स्टोअरेजच्या अधिपत्याखालील मे. वेलवर्थ फुड प्रा. लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., जिल्हा ठाणे या ठिकाणी केली असल्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणुन दिली नाही. त्यांच्या कार्यालयातील शालेय पोषण आहार विभागातील पर्यवेक्षक-नि-भांडारपाल यांनी मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन

यांच्या १९, जयवंत इंडस्ट्रीयल इस्टेट, ६३, ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४ येथील कार्यालयात दिनांक १८/०७/२०१२ रोजी भेट दिली होती. सदर भेटीच्या अहवालाची प्रत सोबत संलग्नीत करण्यात येत आहे, असे नमूद केले आहे.

पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजीचे अभिवेदनात, नमूद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती यांनी तपासात दिलेली माहिती तसेच त्यांना शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला तांदूळ व शासनाकडून प्राप्त करण्यात आलेला तांदूळ व शिल्लक असलेल्या तांदुळाची टॅली करणे बाकी आहे. नमूद गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सुनिलकुमार परती याने अॅन्टीसेपटरी बेल मिळणे कामी मा. सत्र न्यायालय, ठाणे येथे अर्ज दाखल केलेला असून त्याची पुढील सुनावणी दिनांक १८.०१.२०१३ रोजी ठेवण्यात आलेली आहे, असे नमूद केले आहे.

मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा अॅन्ड कंपनी, अॅड. अॅन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजीच्या निवेदनात, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडील वर्क ऑर्डर, चारही विभागाचे करारनामे, वाडा विभागाचा करारनामा, माहे एप्रिल २०१४ पर्यंत विधिग्राह्य असलेले उर्वरीत तीन विभागाचे नुतनीकरण पत्र, वितरण आदेश तसेच चारही विभागाशी संलग्न असलेल्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ५ वी आणि ६ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांची अंदाजीत संख्या तसेच विभाग निहाय खिचडीकरीता वापरण्यात आलेल्या तांदळाचा तपशिल जोडले असून सदरचा साठा वाहतूकीमध्ये अथवा हाताळणीमध्ये वेस्टेज झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर तांदळाच्या साठ्याची साफसफाई केल्यानंतर त्यामधून निघालेली घाण अथवा कचरा याच्या परिमाणाचे तपशिल त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे.

मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा अॅन्ड कंपनी, अॅड. अॅन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक १५/०१/२०१३ रोजीचे निवेदनात, आपण मागणी केल्यानुसार सुनिलकुमार परती यांचे प्रतिज्ञापत्र इस्कॉन या संस्थेस तांदळाचा पुरवठा केल्याबाबतचे विभागनिहाय तपशिल, पटसंख्येनुसार खिचडी शिजवल्याचे तपशिल, प्रत्यक्षात विद्यार्थ्यांनी खाल्लेल्या खिचडीचे तपशिल इत्यादी कागदपत्राची प्रती सादर करीत आहेत, असे नमूद आहे.

मे. इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात, "मे. इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशन ही संस्था मुंबई-ठाणे क्षेत्रामधील ताडदेव, पालघर, वाडा आणि मिरा-भाईंदर या चार विभागांकरीता मध्यान्ह भोजन तयार करण्याचे काम करीत आहे. पालघर विभागामध्ये पंचायत समिती पालघर यांचेसोबत दिनांक २३/११/२००९ रोजी करारनामा झाला आहे. त्याची मुदत दिनांक २३/११/२०१२ पर्यंत आहे. दिनांक २०/१०/२०१२ रोजीच्या पंचायत समितीच्या ठरावानुसार ठाणे जिल्हा परिषद येथे दिनांक १७/११/२०१२ रोजीच्या पत्रान्वये करारनाम्याची मुदत पुढील तीन वर्षे वाढविण्याची शिफारस केली आहे. वाडा विभागाकरीता

G & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE ... MBAI

दिनांक ०१/०१/२०११ रोजी पंचायत समिती वाडा यांचेसोबत करार झाला असून त्याची मुदत माहे एप्रिल, २०१४ पर्यंत आहे. मिरा-भाईंदर विभागाकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिका सोबत सन २००९-१० आणि २०१०-११ या कालावधीकरीता इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरवठा करीत आहे. तद्नंतर सन २०११-१२ आणि सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये नमूद महानगरपालिकेतील ३४ शाळांमधील ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना व १९ शाळांमधील ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना खिचडीचा पुरवठा करावयाचा आहे. सदर करारनाम्यानुसार हजरेपटावरील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरवठा करण्यासाठी ते करारबध्द आहेत. सदर भोजन हे त्यांच्या केंद्रीय स्वंयपाकगृहात तयार करुन संस्थेच्या स्वखर्चाने शाळांमध्ये पुरवठा करण्यात येतो. तांदूळ व्यतिरिक्त इतर आवश्यक खाद्यपदार्थांचा खर्च संस्था करते. भोजनाकरीतां तांदळाचा पुरवठा शासनामार्फत केला जातो. त्याअनुषंगाने हजेरीपटावरील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार मध्यांन्ह भोजन तयार करुन संस्था पुरवठा करीत आहे. बहुतांश वेळी पटावरील विद्यार्थांपेक्षा प्रत्यक्षात हजर असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असतानाही त्यांना पटावरील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार भोजन तयार करावा लागतो. खिचडी तयार करुन संबंधित शाळांच्या आवश्यकतेनुसार पुरवठा करीत असून प्रत्यक्षात खिचडीचा उपभोग घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या त्यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतू माहे नोव्हेंबर, २००९ ते नोव्हेंबर, २०१२ या कालावधीमधील अंदाजे ६३,३७,९५९.१३५ कि.ग्रॅ. तांदळाचा साठा खिचडीसाठी वापरण्यात आलेला आहे. वितरण आदेशानुसार माहे डिसेंबर, २००९ ते ऑक्टोबर, २०१२ या कालावधीमध्ये पालघर विभागाकरीता ३२,१२,१७६ कि.ग्रॅ., वाडा विभागाकरीता १०,८२,३८० कि.ग्रॅ., मिरा-भाईंदर विभागाकरीता ४,४६,०७७ कि.ग्रॅ. व ताडदेव विभागाकरीता २६,४५,६२७ कि.ग्रॅ. तांदळाच्या साठ्याची आवक झालेली आहे. महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या वाहतूकदारामार्फत भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून थेट तुर्भे येथील मे. वेलवर्थ फुडस प्रा.लि. यांच्या गोदामात अथवा साठ्याची सफाई करणारे क्लिनिंग एजंट यांच्याकडे पुरवठा केला जातो. या बाबतचा ट्रकनिहाय तपशिल वेलवर्थ यांच्याकडे उपलब्ध आहे. महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या वाहतुकदारस संबंधित महानगरपालिका/शासनाकडून केंद्रिय स्वंयपाकघरात पुरवठा करण्यासाठी रक्कम अदा केली जाते. परंतू सदर वाहतूकदाराने तुर्भे येथे पुरवठा केल्यानुसार त्यांनी अतिरिक्त वाहतुकीकरीता आजपर्यंत इस्कॉन या संस्थेकडे पैशांची मागणी केलेली नाही. मे. वेलवर्थ या वेअरहाऊसच्या मालकासोबत अधिकृत करारनामा झालेला नसून केवळ दिनांक २०/०९/२०११ रोजीचा इ-मेल पाठविण्यात आलेला आहे. दिनांक ०८/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीमध्ये मागविण्यात आलेले सर्व अभिलेख/दस्ताऐवज सद्यस्थितीत त्यांच्याकडे पूर्णरित्या उपलब्ध नसल्याने ते आवश्कतेनुसार सादर करु शकत नाही. पुढील काळात उपलब्ध झाल्यास ते सादर करण्यात येतील" असे नमूद आहे.

मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. यांचे दिनांक १७/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, आपल्या दिनांक ०९/०१/२०१३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने दिनांक १५/०१/२०१३ रोजी आपले कक्षात झालेल्या चर्चेप्रमाणे व आपण दिलेल्या आदेशाप्रमाणे शालेय पोषण आहार अंतर्गत त्यांच्या संस्थेच्या वतीने मुंबई महापालिका क्षेत्र व ठाणे जिल्ह्यातील तांदूळ वाहतूकीकरीता १) मुंबई महापालिका व उपनगरे- मे. विशाल ट्रान्सपोर्ट कंपनी, प्लॉट नं. ३२, शॉप नं. १०, सिडको बिल्डींग मटेरियल मार्केट, कोपरखैराणे, नवी मुंबई व २) ठाणे जिल्हा- श्री साई मार्केटींग अँड ट्रेडींग कंपनी, एच.ओ. खानदेश मिल शॉपींग कॉम्प्लेक्स, जळगांव, ४२५००१ या पुरवठादार/वाहतूक ठेकेदार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर वाहतूकदार ठेकेदार यांनी वरीलप्रमाणे जिल्ह्यातील कामकाज माहे नोव्हेंबर, २०११ पासून आजतागायत केलेले आहे, असे नमूद केले आहे.

मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा अॅन्ड कंपनी, अॅड. अॅन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक १८/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक १५/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीमध्ये निर्देशित केल्यानुसार तांदूळ साफसफाईकरीता देण्यात आलेल्या वितरण आदेशांच्या छायांकित प्रती माहे नोव्हेंबर, २००९ ते नाव्हेंबर, २०१२ या कालावधीमध्ये वापरण्यात आलेल्या तांदळाच्या साठ्याचे तपशिल, चारही विभागांकरीता कामाचा मोबदला म्हणून आकारण्यात आलेल्या बिलांचे तपशिल, चारही विभागांकडून प्राप्त रकमेचे तपशिल व चारही विभागांकडे शिल्लक असलेल्या रकमेचे तपशिल अवलोकनार्थ सादर करीत आहे, असे नमूद आहे.

दिनांक २२/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस श्री साई मार्केटिंग अॅन्ड ट्रेडिंग कंपनी, जळगांव यांचे वतीने त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री. सुनिल अभिमन्यु सोनवणे यांनी उपस्थित राहून सादर केलेल्या निवेदनात, ठाणे जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत त्यांची संस्था दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप कंझ्युमर्स फेडरेशन लि. या महासंघाशी करारनामा करुन तांदूळ वाहतूक व किराणा माल पुरवठ्याचे काम करीत आहे. सदरच्या अन्नधान्याचा पुरवठा व शासकीय तांदूळाची वाहतूक करण्याकामी त्यांच्या संस्थेने स्थानिक जिल्ह्याच्या ठिकाणी मे. ए.बी. पाटील अँड सन्स गणराज ट्रान्सपोर्ट प्रोप्रा. अनिल बाळकृष्ण पाटील, ४१८, विष्णू निवास, कासट अळी, कोंबडवाडा, भिवडी, जिल्हा ठाणे यांचे सोबत शाळा पोहोच अन्नधान्य व तांदूळ वाहतूकीचा करारनामा केलेला आहे. सदर संस्थामालक अनिल बी. पाटील यांचेशी त्यांनी दुरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, तो स्थानिक भाड्याची वाहने लावुन नियोजित ठिकाणी शाळांना माल पुरवठा करीत असतो. त्यानूसार पालघर व वाडा येथील मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या नियोजित ठिकाणी माल पुरवठा करुन माल मिळाल्याची पोहोच घेतलेली आहे. परंतु मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेस पंचायत समिती, पालघर यांचे पत्र क्र. १५३१, दिनांक २४/०९/२०१० व मा. शिक्षण अधिकारी, जि.प. ठाणे यांचे पत्र ६७१, दिनांक

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

२४/०३/२०१० अन्वये तांदूळ साफसफाई कामी वाशी, नवी मुंबई येथे तांदूळ वाहतूकीकरीता वाहन क्रमांक नोंद करुन परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदर संस्था नियोजित ठिकाणी माल पुरवठा झाल्यानंतर वाशी, नवी मुंबई येथे स्वत: इस्कॉनच्या पावत्या जोडून वाहनात माल वाशी येथे नेत असत व सदर वाहनाचे भाडेही तेच अदा करीत होते, असे नमूद केले आहे.

दिनांक २२/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस विशाल ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक श्री. उमेश शिवाजी पवार यांचे वतीने त्यांचे वडील व मुखत्यारपत्रधारक श्री. शिवाजी लक्ष्मण पवार यांनी उपस्थित राहून सादर केलेल्या निवेदनात, आपल्या दिनांक १७/०१/२०१३ च्या पत्रानुसार मुंबई विभागाकरीता शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदूळाची वाहतूक त्यांची वाहतूकसंस्था महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर्स मार्केटींग फेडरेशन लि. यांचे प्रतिनिधी म्हणुन भारतीय खाद्य निगम, बोरीवली येथून करीत आहे. म.न.पा. मुंबई यांनी काही शाळांना आहार शिजवून देण्यासाठी मे. इस्कॉन फुडस या संस्थेची नेमणूक केलेली आहे. या संस्थेच्या नावे मिळालेल्या नियतनाप्रमाणे त्यांची वाहतूकसंस्था तांदूळाचा पुरवठा करीत आहे. मे. इस्कॉन फुड्स यांचे दिनांक २३/०४/२०१२ च्या पत्रानुसार व तोंडी विनंतीनुसार तांदूळ साठवणूक करण्याकरीता त्यांचे गोदाम नवी मुंबई येथे आहे. तरी तांदूळाचे ट्रक खाली करण्यासाठी वाशी येथील पटेल कोल्ड स्टोअरेज या वेअरहाऊसमध्ये पाठवाव्यात अशी विनंती केल्यामुळे त्यांनी सदर ठिकाणी तांदूळाचे ट्रक खाली करण्यासाठी पाठविल्या होते, असे नमूद केले आहे.

मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. यांचे दिनांक २४/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक २२/०१/२०१३ रोजी आपले कक्षात सुनावणीच्या दरम्यान झालेल्या चर्चेप्रमाणे व दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांच्या संस्थेने मे. विशाल ट्रान्सपोर्ट, मुंबई व मे. साई ट्रेडींग अँड मार्केटींग कंपनी, जळगांव यांचे समवेत केलेल्या शालेय पोषण आहार व तांदूळ वाहतूकीच्या कामाकरीता केलेल्या करारनाम्याची छायाप्रत सोबत सादर करीत असल्याचे नमूद केले आहे.

मे. ए.बी. पाटील ॲण्ड सन्स या संस्थेचे मालक अनिल बाळकृष्ण पाटील यांनी दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीच्या दिवशी दिलेल्या लेखी जबाबात, मे. ए.बी. पाटील अँड सन्स या नावे असलेल्या वाहतूकदार संस्थेचा तो मालक असुन शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदूळाच्या साठ्याची भिवंडी येथील शासकीय गोदामातून उचल करुन संबंधित शाळा अथवा त्यास संलग्न असलेल्या संस्थेच्या केंद्रीय स्वंयपाकघरात वितरण करण्याची त्यांची जबाबदारी आहे. सदर वाहतूकीच्या कामकाजाकरीता त्यांची नेमणूक मे. साई मार्केटींग व ट्रेडींग कंपनी, जळगांव या वाहतूकदाराने केली आहे. त्याचे वाहतूकीचे कार्यक्षेत्र संपूर्ण ठाणे जिल्हा आहे. त्याअनुषंगाने त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील ट्रकमार्फत मे. इस्कॉन फुड रिलीक फाऊंडेशन या संस्थेच्या मिरा भाईंदर, पालघर व

CONTROLLER OF RATIO

वाडा विभागातील शाळा करीता तांदळाच्या साठ्याचे मागील एक वर्षापासून वाहतूकदार म्हणुन वाहतूकीचे काम करीत आहे. सदर वाहूकीच्या कामाकरीता त्यांनी मे. कदम ट्रान्सपोर्ट या उपवाहतुकदाराची त्यांच्या स्तरावर विना करारनामा नेमणूक केली असून अतिरिक्त गाड्यांची गरज भासल्यास आवश्यकतेनुसार ते ट्रक उपलब्ध करुन देत आहे. सुनावणीच्या वेळी सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त असलेल्या वाशी येथील तांदूळाच्या साठ्याबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता सदर वेअरहाऊसमध्ये त्यांनी पालघर व वाडा विभागातील मे. इस्कॉन फुड या संस्थेच्या अधिपत्याखालील जिल्हा परिषद शाळांच्या तांदूळाचा साठा माहे जुन, २०१२ पासुन मे. इस्कॉन फुडचे प्रतिनिधी श्री. अवस्थी व श्री. राजु नायर यांनी दिलेल्या मौखिक आदेशानुसार वितरण केले आहे. तसेच त्यापुर्वीच्या कालावधीत वाडा व पालघर विभागाचा संपूर्ण तांदूळ साठा पालघर माहिम रोड, पालघर येथील मे. इस्कॉन फुड यांच्या गोदामावर वितरण केले आहे. मिरा भाईंदर विभागाचा तांदळाचा साठा हा शासकीय गोदामातून उचल करुन थेट त्या विभागातील महानगरपालिकेच्या संबंधित शाळांना वितरण केले असुन सदरहू विभागाचा साठा मे. पटेल कोल्ड स्टोरेज वाशी येथे वितरण केलेला नाही. पालघर व वाडा या दोन विभागापैकी पंचायत समिती, पालघर यांनी वाशी येथील वेअरहाऊसवर ट्रक क्रमांक १) एमएच-४३-ई-९०२, २) एमएच-०४-ईबी-९००२, ३) एमएच-०४-सीपी-१०१७ व ४) एमएच-०४-बीयु-५४५९ या ४ ट्रक अन्वये साठवणूकीस परवानगी दिली असुन वाडा विभागाकरीता वाशी येथे साठवणूकीस परवानगी दिलेली नाही. परंतू, मे इस्कॉन फुड या संस्थेच्या नमूद प्रतिनिधींनी दिलेल्या आदेशानुसार वाशी येथे वितरण केले आहे. वितरणाच्या पुराव्यादाखल कदम ट्रान्सपोर्ट यांचे बिल क्रमांक १२४ ते १२७ अशी चार बिलांची छायाकिंत प्रती सादर केली. त्याअनुषंगाने अधिकाऱ्यांनी सदर बिलांचे अवलोकन केले असता त्यामध्ये पालघर विभागाने मान्यता दिलेल्या चार ट्रक व्यतिरिक्त इतर मान्यता नसलेल्या ट्रकद्वारे वितरण केल्याचे आढळुन आले आहे. मे. इस्कॉन फुड या संस्थेकडून वाशी येथील गोदामावर वितरण करण्यासाठी रु. २८०/- प्रति टन याप्रमाणे अतिरिक्त मोबदला मिळत आहे. सदरचा तांदूळाच्या साठ्याचा पुरवठा वाशी येथील वेअरहाऊसवर विना परवानगी केल्याची बाब त्याला मान्य असुन सदरची बाब मा. जिल्हास्तरीय समिती तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्या कार्यालयास दिनांक १८/०७/२०१२ रोजीच्या सभेपूर्वी सांगुन दिली की, शासन निर्णयानुसार ग्रामीण भागात शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदुळ व कडधान्याचा पुरवठा थेट शाळेंना करणे गरजेचे आहे. परंतु संबंधित कार्यालयांच्या अधिकाऱ्यांनी विशेष बाब म्हणून मे. इस्कॉन फुड या संस्थेच्या फक्त तांदूळाच्या साठ्याची वाशी येथे वितरण करावयास सांगितले, असे नमूद केले आहे.

मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांचे दिनांक ३०/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक १५/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीमध्ये झालेल्या

DIRECTOR CIVIL SUPPLIES OFFICE

चर्चेच्या अनुषंगाने ते बँकेचे स्टेटमेंट सादर करीत असून त्याअनुषंगाने माहे जानेवारी, २०१० ते ऑक्टोबर, २०१२ या कालावधीमध्ये इस्कॉन या संस्थेच्या वतीने वेअरहाऊसींग एजंट, क्लिनिंग एजंट आणि वाहतूकदार यांना अदा केलेल्या रकमेचे तपशिल समाविष्ट आहे, असे नमूद केले आहे.

पोलिस निरिक्षक (प्रशा), नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचकडून दिनांक २८/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, नमूद गुन्ह्यातील अटक आरोपी पंकज ठक्कर यांचेकडे नमूद गुन्ह्यातील फसवणूकीबाबत अधिक तपास करणे आवश्यक असल्याने त्यांना पोलिस ठाण्यात हजर राहणेबाबत समज देण्यात आली आहे. परंतू ते बाहेर गांवी असल्याने तपास कामी हजर राहिलेले नाहीत. तसेच पाहिजे आरोपी कानजी भाई बच्चू पटेल उर्फ रावरीया यांचेविरुध्द अटक करणे इतपत पुरावा उपलब्ध करण्योच काम चालू असून नमूद पाहिजे आरोपीतांकडे सदर गुन्ह्याबाबत विचारपूस करुन सदर गुन्ह्याचा अधिक तपास करुन पाहिजे आरोपीत याने नेरुळ येथील पटेल वेअरहाऊसमधील शालेय पोषण आहाराचे तांदूळाचा अपहार केला आहे अगर कसे ? याबाबत तपास करुन तसा पुरावा उपलब्ध झाल्यास त्यांना अटक करण्याची कारवाई करीत आहोत, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०२/११/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी) यांच्या अधिपत्याखालील फिरते पथकाने पंचासह मे. पटेल कोल्ड स्टोरेज च्या अधिपत्त्याखालील मे. वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., नवी मुंबई या ठिकाणी शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ विनापरवानगी साठवणूक केल्याबाबत मिळालेल्या गुप्त बातमीच्या अनुषंगाने नमूद वेअरहाऊसमध्ये धाड टाकली असता मोठया प्रमाणावर मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेचा शालेय पोषण आहार योजनेचा तांदळाच्या साठयाची अवैध साठवणुक केल्याचे आढळून आले. मे. इस्कॉन फूड फाऊंडेशन रिलीफ चे शाखा मॅनेजर सुनिलकुमार परती तसेच पटेल कोल्ड स्टोरेजच्या अधिपत्त्याखालील मे. वेलवर्थ फूड प्रा.लि., डी-३६/१, तुर्भे एम.आय.डी.सी., जि.ठाणे चे संचालक इमरान फारुक पटेल व शकील इस्माईल पटेल, तसेच अेस (Ace) इंटरनॅशनल चे मालक पंकज ठक्कर यांनी संगनमताने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांना देय असलेल्या तांदळाच्या साठयाची चोरी करुन साठेबाजी व नफेखोरीच्या उद्देशाने सदर धान्याचा काळाबाजार केल्याचे तपासणीत निष्पन्न झाल्याने त्यांनी गोरगरीब पात्र लाभार्थी असलेल्या शालेय विद्यार्थ्यांची तसेच पर्यायाने शासनाची घोर फसवणूक

CONTROLLER OF RATIONING

0029
केल्याचे सिध्द झाल्याने सर्वसंबंधितांनी जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ७, ८ व १०, पब्लीक डीस्ट्रीब्यूशन सिस्टीम ऑर्डर २००१ तसेच शासन निर्णय शालेय पोषण आहार-१००१/प्र.क्र./१३४/नापु१७, दिनांक २७.८.२००१, शासन निर्णय शालेय पोषण आहार-२००४/(२४६/४)/प्राशि/ ०४, दिनांक १२.७.२००५ चा भंग केल्याने संबंधितांविरुध्द नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ३०४१/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन रु. २,२९,००,५००/- एवढया किंमतीचा मुद्देमाल जागीच जप्त करुन उपस्थित पोलिसांसमोर सदर गोदाम सिल करुन जप्त मुद्देमाल त्यांचे ताब्यात देण्यात आला. तद्नंतर पुढील तपासामध्ये आढळुन आलेल्या दोषांच्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध भारतीय दंड विधानचे कलम ४०६ व ४२० वाढविण्यात आल्याबाबत तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी अहवाल सादर केलेला आहे.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरिता दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५ पासुन केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी संस्थांच्या अनुदानित व अंशत: अनुदानीत शाळा, वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे या ठिकाणी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभ घेत आहेत. सन २००१ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने शालेय पोषण आहार योजनेमध्ये विद्यार्थ्यांना तांदुळ घरी न देता शिजवलेले अन्न (Cooked Food) द्यावे, अशा स्वरुपाचे आदेश दिले. त्यानुसार सन २००२ पासुन या योजनेचे स्वरुप बदलुन घरी तांदुळ देण्याऐवजी विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न देण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक- शापोआ २००९/प्र.क्र.१३६/प्राशि ४, दिनांक १८ जुन, २००९ अन्वये नागरी भागांमध्ये असणाऱ्या शाळांमध्ये (विशेषत: महानगरांमध्ये) जागेची कमतरता असल्यामुळे अन्न शिजवुन देण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नागरी भागातील शाळांसाठी शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी महिला मंडळे/बचतगट/कंत्राटदार यांची नियुक्ती करण्यात येऊन त्यामार्फत आहार पुरवठा करण्यात यावा, असे नमूद आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे परिपत्रक क्र. शापोआ/सुधायो/प्राशिसं/३०३/ २०११-७१७७(अ) दिनांक ०१/११/२०११ नुसार शासन निर्णय क्रमांक शापोआ-२००९/प्र.क्र. १३६/प्राशि-४ दिनांक १८/०६/२००९ अन्वये ग्रामिण भागात तांदुळ आणि धान्यादी माल व इतर साहित्याचा पुरवठा शाळांना थेट होणार आहे. तर शहरी भागात तांदुळाची वाहतुक करुन शाळांना किंवा शाळांनी केंद्रीय स्वयपाक गृहाचा अवलंब केला असल्यास त्या ठिकाणापर्यंत तांदुळाचा पुरवठा केला जाणार असल्याचे नमुद आहे. तसेच शासन निर्णय दिनांक

0030

१८/०६/२००९, दिनांक ०२/०२/२०११ नुसार शिक्षण संचालनालया मार्फत सन २०११-१२ साठी निविदा प्रक्रिया राबवून पुरवठाधारकाची निवड करण्यात आलेली असुन शासनाच्या दिनांक २९/०९/२०११ च्या पत्रांन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमरर्स फेडरेशन, मुंबई यांना मुंबई/ठाणे विभागासाठी पुरवठादार म्हणुन नियुक्त केले आहे. त्याअनुषंगाने शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचा अतिरीक्त कार्यकारी संचालक, महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमरर्स फेडरेशन, मुंबई यांच्यासमवेत दिनांक ०१/११/२०११ रोजी झालेल्या वाहतुकीच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक असुन ते पुरवठादारास मान्य असल्याचे नमुद आहे. सदर करारनाम्यातील अट क्र. ३(ब) नुसार नागरी भागातील शाळांसाठी लागणारा तांदुळ भारतीय अन्न महामंडळाचे गोदामामधुन तांदळाची उचल करुन शाळास्तरापर्यंत किंवा शाळांसाठी शिजवलेल्या अन्नाचा पुरवठा करण्यासाठी नेमलेल्या एजन्सीपर्यंत (केंद्रीय स्वयंपाकगृहापर्यंत) पुरवठा करण्यासाठी संबंधित शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका यांचेमार्फत पुरवठा आदेश देण्यात येतील. अट क्र. ६ नुसार तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करणाऱ्या वाहनावर पुरवठादाराने शालेय पोषण आहार योजनेचा बोर्ड लावणे आवश्यक राहील असे स्पष्ट नमुद आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांच्या वतीने कांगा ॲन्ड कंपनी, ॲड. ॲन्ड सोलिसिटरस् यांनी या कार्यालयात सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाशात, मे. इस्कॉन या संस्थेस संबंधित प्राधिकरणाकडून तांदळाचा विनामुल्य पुरवठा करण्यात येत असुन माहे नोव्हेंबर, २०११ पूर्वी नमूद संस्थेने भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून तांदळाच्या साठ्याची उचल केली आहे. तद्नंतरच्या कालावधीकरिता महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर मार्केटिंग फेडरेशन हे वाहतूकदार बोरीवली व भिवंडी येथील गोदामातून संस्थेच्या आवारात तांदळाच्या पुरवठ्याकरीता करारबध्द असल्याचे सांगितले. भारतीय खाद्य निगम यांच्या गोदामातून प्राप्त झालेला तांदळाचा साठा हा विना सफाईचा तसेच कचरायुक्त असल्याने व बारदाणाच्या गोण्या हे बहुतांश वेळी फाटले असल्याने साठ्याची नासाडी होत आहे. त्यामुळे सदर अवस्थेत थेट केंद्रिय स्वंयपाकघरात पुरवठा करण्याऐवजी तो साठा साफसफाईच्या प्रक्रियेसाठी क्लिनिंग युनिटमध्ये पाठविण्याशिवाय पर्याय नाही. संस्थेस ताडदेव, मिरा-भाईंदर, पालघर व वाडा या विभागातील शाळा संलग्न असून नमूद विभागातील ४ स्वंयपाकघराजवळ क्लिनिंग युनिट उपलब्ध नसल्याने त्यांनी साफसफाईच्या प्रक्रियेसाठी नवी मुंबई येथील अेस इंटरनॅशनल, विचि ॲग्रो प्रोडक्टस् प्रा.लि., फ्लेमिंगो व ग्लोबल या ठिकाणी साफसफाई करीता तांदळाचा साठा पाठविला असल्याचे सांगितले. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणारा तांदळाचा साठा हा अतिरिक्त होत असल्याची बाब त्यांनी संबंधित प्राधिकरण्याच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. सदर योजने अंतर्गत प्राप्त झालेला तांदळाचा

साठा हा एस इंटरनॅशनल येथे साफसफाईची प्रक्रिया पूर्ण करुन तद्नंतर ४ केंद्रीय स्वंयपाकघरात पुरवठा करण्यात येत असुन तांदळाच्या साठ्याची साफसफाई केली जाते व साफसफाई केल्यानंतर त्याचे वजनामध्ये कमतरता येत असल्याचे सांगितले. मे. इस्कॉन या संस्थेचा एस इंटरनॅशनल अथवा त्यांच्या वतीने होणाऱ्या इतर गतिविधीमध्ये कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्याचे सांगितले.

मे. इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात, "मे. इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशन ही संस्था मुंबई-ठाणे क्षेत्रामधील ताडदेव, पालघर, वाडा आणि मिरा-भाईंदर या चार विभागांकरीता मध्यान्ह भोजन तयार करण्याचे काम करीत आहे. सदर करारनाम्यानुसार हजेरेपटावरील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पुरवठा करण्यासाठी ते करारबध्द आहेत. सदर भोजन हे त्यांच्या केंद्रीय स्वंयपाकगृहात तयार करुन संस्थेच्या स्वखर्चाने शाळांमध्ये पुरवठा करण्यात येतो. त्याअनुषंगाने हजेरीपटावरील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार मध्यान्ह भोजन तयार करुन संस्था पुरवठा करीत आहे. माहे नोव्हेंबर, २००९ ते नोव्हेंबर, २०१२ या कालावधीमधील अंदाजे ६३,३७,९५९.१३५ कि.ग्रॅ. तांदळाचा साठा खिचडीसाठी वापरण्यात आलेला आहे. वितरण आदेशानुसार माहे डिसेंबर, २००९ ते ऑक्टोबर, २०१२ या कालावधीमध्ये पालघर विभागाकरीता ३२,१२,१७६ कि.ग्रॅ., वाडा विभागाकरीता १०,८२,३८० कि.ग्रॅ., मिरा-भाईंदर विभागाकरीता ४,४६,०७७ कि.ग्रॅ. व ताडदेव विभागाकरीता २६,४५,६२७ कि.ग्रॅ. तांदळाच्या साठ्याची आवक झालेली आहे. महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या वाहतूकदारामार्फत भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून थेट तुर्भे येथील मे. वेलवर्थ फुडस प्रा.लि. यांच्या गोदामात अथवा साठ्याची सफाई करणारे क्लिनिंग एजंट यांच्याकडे पुरवठा केला जातो. महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या वाहतुकदारास संबंधित महानगरपालिका/शासनाकडून केंद्रिय स्वंयपाकघरात पुरवठा करण्यासाठी रक्कम अदा केली जाते. परंतू सदर वाहतूकदाराने तुर्भे येथे पुरवठा केल्यानुसार त्यांनी अतिरिक्त वाहतुकीकरीता आजपर्यंत इस्कॉन या संस्थेकडे पैशांची मागणी केलेली नाही. मे. वेलवर्थ या वेअरहाऊसच्या मालकासोबत अधिकृत करारनामा झालेला नसून केवळ दिनांक २०/०९/२०११ रोजीचा ई-मेल पाठविण्यात आलेला आहे " असे नमूद आहे.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांच्या वतीने ताडदेव, मिरा भाईंदर, पालघर व वाडा या चारही विभागातील संस्थेस संलग्न असलेल्या शाळेतील १ ली ते ५ वी व ६ वी ते ८वी इयत्तेमधील हजेरीपटावरील विभागनिहाय विद्यार्थ्यांची संख्या, विभागनिहाय प्रत्यक्षात उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या तसेच त्याअनुषंगाने माहे जुन, २०१२ ते माहे ऑक्टोबर, २०१२ या कालावधीमध्ये प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्येनुसार विभागनिहाय मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आलेल्या

0032

तांदळाच्या साठ्याचा तपशिल सादर केले आहे. सदर अहवालामधील आकडेवारीचे अवलोकन करता माहे जुन, २०१२ ते माहे ऑक्टोबर, २०१२ या कालावधीमध्ये ताडदेव विभागाकरीता ७५७६.७७ क्विंटल, मिरा भाईंदर विभागाकरीता ३९०.६२ क्विंटल, पालघर विभागाकरीता ५७०२.१० क्विंटल व वाडा विभागाकरीता २३१४.१० क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण १५९८३.५९ क्विंटल शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदळाचा साठा सदर संस्थेस प्राप्त झाल्याचे दिसून येते.

ताडदेव विभाग- सदर विभाग हे बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांच्या वतीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता नमूद विभागामध्ये हजेरीपटावरील विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ५,२७,१३०, जुलै-२०१२ मध्ये ९,२६,५३६, ऑगस्ट-२०१२ मध्ये ७,८८,४८०, सप्टेंबर-२०१२ मध्ये ६,७९,५५४ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ११,३४,६५० असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ४०,५६,३५० विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ४,४७,२१०, जुलै-२०१२ मध्ये ८,६२,४४६, ऑगस्ट-२०१२ मध्ये ६,९९,७९८, सप्टेंबर-२०१२ मध्ये ६,००,४६७ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ९,०७,५५० असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ३५,१७,४७१ विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. त्यापैकी प्रत्यक्षात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ४,०३,८९२, जुलै-२०१२ मध्ये ८,८३,१८९, ऑगस्ट-२०१२ मध्ये ७,६२,५४४, सप्टेंबर-२०१२ मध्ये ६,९०,०३५ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ८,५२,५३८ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ३५,९२,१९८ उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ३,३५,९०४, जुलै-२०१२ मध्ये ७,४५,९००, ऑगस्ट-२०१२ मध्ये ६,३४,२९७, सप्टेंबर-२०१२ मध्ये ५,७४,८०२ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ६,९१,२६७ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण २९,८२,१७० उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. तद्नंतर प्रत्यक्षात उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचा लाभ देताना प्राप्त तांदळाच्या साठ्यामधील ७६२.५४ क्विंटल, सप्टेंबर-२०१२ मध्ये ६९०.०३ क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ८५२.५३ क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ३५९२.१७ क्विंटल तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्याकरीता माहे जुन-२०१२ मध्ये ५०३.८६ क्विंटल, जुलै-२०१२ मध्ये १११८.८५ क्विंटल, ऑगस्ट-२०१२ मध्ये ९५१.४४ क्विंटल, सप्टेंबर-२०१२ मध्ये ८६२.२० क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये १०३६.९० क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ४४७३.२५ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आले असल्याचे दिसुन येते. म्हणजेच माहे जुन- २०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १

0033
ली ते ५ वी व ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता एकुण ८०६५.४२ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आल्याचे सादर केलेल्या आकडेवारीनुसार सकृतदर्शनी दिसुन येते. तथापी, माहे जुन-२०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १ली ते ८वी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता एकुण ७५७६.७७ क्विंटल तांदळाचा साठा आवक झालेला असताना मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने एकुण ८०६५.४२ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आल्याचे दर्शविले आहे. म्हणजेच त्यांना प्राप्त झालेल्या साठ्यापेक्षा एकुण ४८८.६५ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता अतिरिक्त वापर केल्याचे दर्शविले आहे.

<u>मिरा भाईंदर विभाग-</u> सदर विभाग हे मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांचे वतीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता नमूद विभागामध्ये हजेरीपटावरील विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये १,३८,३४५, जुलै-२०१२ मध्ये २,४२,७६२, ऑगस्ट-२०१२ मध्ये २,०९,०८८, सप्टेंबर-२०१२ मध्ये १,८०,५७६ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये २,२८,०९६ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ९,९८,८६७ विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ८८,६७३, जुलै-२०१२ मध्ये १,५३,६९९, ऑगस्ट-२०१२ मध्ये १,३०,०५३, सप्टेंबर-२०१२ मध्ये १,१२,३१९ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये १,४१,८७६ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ६,२६,६२० विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. त्यापैकी प्रत्यक्षात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ६०,२८८, जुलै-२०१२ मध्ये १,५२,३७१, ऑगस्ट-२०१२ मध्ये १,३५,५०७, सप्टेंबर-२०१२ मध्ये १,२२,५४२ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये १,४६,५११ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ६,१७,२१९ उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ३४,१९०, जुलै-२०१२ मध्ये ७८,९४०, ऑगस्ट-२०१२ मध्ये ६९,८०९, सप्टेंबर-२०१२ मध्ये ५९,६०० व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ७३,५६० असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ३,१६,०९९ उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. तद्नंतर प्रत्यक्षात उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचा लाभ देताना प्राप्त तांदळाच्या साठ्यामधील प्रत्यक्षात वापरण्यात आलेल्या तांदळाच्या साठ्याच्या तपशिलाचे अवलोकन करता इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांकरीता माहे जुन-२०१२ मध्ये ६०.२९ क्विंटल, जुलै-२०१२ मध्ये १५२.३७ क्विंटल, ऑगस्ट-२०१२ मध्ये १३५.५१ क्विंटल, सप्टेंबर-२०१२ मध्ये १२२.५४ क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये १४६.५१ क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ६१७.२२ क्विंटल तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता माहे जुन-२०१२ मध्ये ५१.२८ क्विंटल, जुलै-२०१२ मध्ये ११८.४१ क्विंटल, ऑगस्ट-२०१२ मध्ये १०४.७१ क्विंटल,

सप्टेंबर-२०१२ मध्ये ८९.४० क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ११०.३४ क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ४७४.१४ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आले असल्याचे दिसुन येते. म्हणजेच माहे जुन- २०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी व ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता एकुण १०९१.३६ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आल्याचे सादर केलेल्या आकडेवारीनुसार सकृतदर्शनी दिसुन येते. तथापी, माहे जुन-२०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १ली ते ८वी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता एकुण ३९०.६२ क्विंटल तांदळाचा साठा आवक झालेला असताना मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने एकुण १०९१.३६ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आल्याचे दर्शविले आहे. म्हणजेच त्यांना प्राप्त झालेल्या साठ्यापेक्षा एकुण ७००.७४ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता अतिरिक्त वापर केल्याचे दर्शविले आहे.

पालघर विभाग- सदर विभाग हे जिल्हा परिषद, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांचे वतीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता नमूद विभागामध्ये हजेरीपटावरील विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ४,२३,६००, जुलै-२०१२ मध्ये ८,८२,५००, ऑगस्ट-२०१२ मध्ये ८,११,९००, सप्टेंबर-२०१२ मध्ये ७,७६,६०० व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ८,४७,२०० असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ३७,४१,८०० विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये २,७७,२००, जुलै-२०१२ मध्ये ५,७७,५००, ऑगस्ट-२०१२ मध्ये ५,३१,३००, सप्टेंबर-२०१२ मध्ये ५,०८,२०० व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ५,५४,४०० असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण २४,४८,६०० विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. त्यापैकी प्रत्यक्षात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ३,७७,६९४, जुलै-२०१२ मध्ये ७,९१,५६१, ऑगस्ट-२०१२ मध्ये ६,६७,३५१, सप्टेंबर-२०१२ मध्ये ५,७१,०६९ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ७,०४,५७४ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ३१,१२,२४९ उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये १,७२,००४, जुलै-२०१२ मध्ये ३,५५,९५९, ऑगस्ट-२०१२ मध्ये ३,०५,२८२, सप्टेंबर-२०१२ मध्ये २,८६,६७७ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ३,३३,०९९ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण १४,५३,०२१ उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. तद्नंतर प्रत्यक्षात उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचा लाभ देताना प्राप्त तांदळाच्या साठ्यामधील प्रत्यक्षात वापरण्यात आलेल्या तांदळाच्या साठ्याच्या तपशिलाचे अवलोकन करता इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांकरीता माहे जुन-२०१२ मध्ये ३७७.६९ क्विंटल, जुलै-२०१२ मध्ये ७९१.५६ क्विंटल, ऑगस्ट-२०१२ मध्ये ६६७.३५ क्विंटल, सप्टेंबर-२०१२ मध्ये ५७१.०७ क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ७०४.५७ क्विंटल असे

मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ३११२.२४ क्विंटल तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता माहे जुन-२०१२ मध्ये २५८.०१ क्विंटल, जुलै-२०१२ मध्ये ५३३.९४ क्विंटल, ऑगस्ट-२०१२ मध्ये ४५७.९२ क्विंटल, सप्टेंबर-२०१२ मध्ये ४३०.०२ क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ४९९.६५ क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण २१७९.५४ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आले असल्याचे दिसुन येते. म्हणजेच माहे जुन- २०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी व ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता एकुण ५२९१.७८ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आल्याचे सादर केलेल्या आकडेवारीनुसार सकृतदर्शनी दिसुन येते. तथापी, माहे जुन-२०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १ली ते ८वी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता एकुण ५७०२.१० क्विंटल तांदळाचा साठा आवक झालेला असताना मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने प्रत्यक्षात एकुण ५२९१.७८ क्विंटल तांदळाच्या साठ्याचा वापर केला आहे. म्हणजेच त्यांना प्राप्त झालेल्या साठ्यापेक्षा एकुण ४१०.३२ क्विंटल तांदळाच्या साठ्याचा मध्यान्ह भोजन योजनेकरीता कमी वापर केला आहे.

<u>वाडा विभाग-</u> सदर विभाग हे जिल्हा परिषद, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांचे वतीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता नमूद विभागामध्ये हजेरीपटावरील विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये २,३८७०६, जुलै-२०१२ मध्ये ४,८०,०६४, ऑगस्ट-२०१२ मध्ये ४,०७,६८२, सप्टेंबर-२०१२ मध्ये ३,८८,६८९ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ४,४४,८४० असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण १९,५९,९८१ विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये १,७३,१४१, जुलै-२०१२ मध्ये ३,४५,७३५, ऑगस्ट-२०१२ मध्ये २,९२,५४५, सप्टेंबर-२०१२ मध्ये २,८०,७९१ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ३,२०,९०४ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण १४,१३,११६ विद्यार्थी हजेरीपटावर असल्याचे दिसुन येते. त्यापैकी प्रत्यक्षात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या तपशिलामध्ये १ ली ते ५ वी या इयत्तांमध्ये माहे जुन-२०१२ मध्ये २,०४,८८२, जुलै-२०१२ मध्ये ४,२८,३५४, ऑगस्ट-२०१२ मध्ये ३,६२,०५५, सप्टेंबर-२०१२ मध्ये ३,१३,४५३ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ३,८०,७९७ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण १६,८९,५४१ उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये माहे जुन-२०१२ मध्ये ८३,३९४, जुलै-२०१२ मध्ये १,७०,००२, ऑगस्ट-२०१२ मध्ये १,४०,३४७ सप्टेंबर-२०१२ मध्ये १,२४,१३४ व ऑक्टोबर-२०१२ मध्ये १,५०,५९९ असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण ६,६८,४७६ उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ दिला असल्याचे दिसुन येते. तद्नंतर प्रत्यक्षात उपस्थित विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचा लाभ देताना प्राप्त तांदळाच्या साठ्यामधील प्रत्यक्षात वापरण्यात आलेल्या तांदळाच्या साठ्याच्या तपशिलाचे अवलोकन करता इयत्ता १ ली ते ५

वी च्या विद्यार्थ्यांकरीता माहे जुन-२०१२ मध्ये २०४.८८ क्विंटल, जुलै-२०१२ मध्ये ४२८.३५ क्विंटल, ऑगस्ट-२०१२ मध्ये ३६२.०६ क्विंटल, सप्टेंबर-२०१२ मध्ये ३१३.४५ क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये ३८०.८० क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण १६८९.५४ क्विंटल तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता माहे जुन-२०१२ मध्ये १२५.१० क्विंटल, जुलै-२०१२ मध्ये २५५.०० क्विंटल, ऑगस्ट-२०१२ मध्ये २१०.५२ क्विंटल, सप्टेंबर-२०१२ मध्ये १८६.२० क्विंटल व ऑक्टोबर-२०१२ मध्ये २२५.८९ क्विंटल असे मिळुन नमूद कालावधीमध्ये एकुण १००२.७१ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आले असल्याचे दिसुन येते. म्हणजेच माहे जुन- २०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १ ली ते ५ वी व ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता एकुण २६९२.२५ क्विंटल तांदळाचा साठा मध्यान्ह भोजन योजनेकरीता वापरण्यात आल्याचे सादर केलेल्या आकडेवारीनुसार संकृतदर्शनी दिसुन येते. तथापी, माहे जुन-२०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या कालावधीमध्ये इयत्ता १ली ते ८वी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता एकुण २३१४.१० क्विंटल तांदळाचा साठा आवक झालेला असताना मे. इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने प्रत्यक्षात एकुण २६९२.२५ क्विंटल तांदळाच्या साठ्याचा वापर केला आहे. म्हणजेच त्यांना प्राप्त झालेल्या साठ्यापेक्षा एकुण ३७८.१५ क्विंटल तांदळाच्या साठ्याचा मध्यान्ह भोजन योजनेकरीता अतिरिक्त वापर केल्याचे दर्शविले आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी वरील नमूद चारही विभागांची आकडेवारी सादर केली असुन त्याअनुषंगाने चालु शैक्षणिक वर्षामध्ये माहे जुन-२०१२ ते ऑक्टोबर-२०१२ या पाच महिन्यांकरीता शासनाकडून एकुण १५९८३.५९ क्विंटल तांदळाचा साठा त्यांना प्राप्त झाल्याचे दिसुन येते. सदर कालावधीमध्ये एकुण १,४४,३०,९७३ प्रत्यक्षात उपस्थित विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न पुरवठा केल्याचे सादर केलेल्या आकडेवारीनुसार दिसुन येत आहे. सदर विद्यार्थ्यांकरीता मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेने एकुण १५९८३.५९ क्विंटल तांदळाचा साठा प्राप्त असताना प्रत्यक्षात १७१४०.८१ क्विंटल तांदळाचा साठा खिचडीकरीता वापरण्यात आल्याचे आकडेवारी सादर केलेली आहे. म्हणजेच नमूद संस्थेने प्राप्त साठ्यापेक्षा ११५७.२२ क्विंटल तांदळाच्या साठ्याचा अतिरिक्त वापर केल्याचे दर्शविले असुन त्याअनुषंगाने त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडून शिजवलेले अन्न (Cooking Charges) करीता अतिरिक्त बिल आकारणीची आकडेवारी सादर केल्याचे दिसुन येते. सदर बाब साशंकता निर्माण करणारी असुन त्यांनी शासनाकडून नियतनानुसार प्राप्त झालेला संपूर्ण तांदळाचा साठा हा खिचडी शिजवण्यासाठी पुर्णपणे वापर करुन त्यांनी अतिरिक्त ११५७.२२ क्विंटल तांदळाच्या साठ्याची बिलाची आकारणी करुन संबंधित प्राधिकरणाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभूल व घोर फसवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी दिनांक ०२/११/२०१२ रोजी मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि. यांच्या वेअरहाऊसमध्ये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत वितरीत करावयाच्या तांदळाच्या साठ्याची बेकायदेशीररीत्या अवैध साठवणूक केल्याचे पथकास निदर्शनास आले. मे. इस्कॉन फूड फाऊंडेशन रिलीफ या संस्थेचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी शालेय पोषण आहार योजनेचा तांदूळ त्यांना नेमून दिलेल्या चार विभागांना व त्यांच्याकडे चार विभागानिहाय स्वतंत्र स्वयंपाकघर उपलब्ध असताना सदरचा एवढया मोठया प्रमाणावरील तांदळाचा साठा त्यांनी तुर्भे येथील मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि. यांच्या वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे व सदरचे ठिकाण हे नमूद चारही विभागापासून विभक्त तसेच फार दुर अंतरावर असल्याचे व सोयीस्कर नसल्याचे तपासणीत पथकास आढळून आले. सदर संस्थेचे व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांच्याकडे पथकाने विचारणा केली असता, संस्थेने घेतलेले निर्णय त्यांना बंधनकारक आहे व त्याची अंमलबजावणी करण्याचे काम त्यांचे आहे असे त्यांनी घटनास्थळी दिलेल्या लेखी जबाबातही नमूद केलेले आहे. यावरुन सदर वेअरहाऊसमध्ये आढळलेला मोठया प्रमाणावरील साठा क्लिनींगच्या नावाखाली अेस (Ace) इंटरनॅशनल या ठिकाणावरुन बेकायदेशीररित्या अवैध मार्गाने विक्री करण्याच्या उद्देशाने साठा करुन ठेवल्याचे सकृतदर्शनी तपासणीत आढळून आल्याने या कार्यालयाचे दुसरे पथक अेस (Ace) इंटरनॅशनल, अे-७८८/१, एम.आय.डी.सी. खैराने, नवी मुंबई येथे चौकशी करणे करीता पाठविण्यात आले. सदर पथकाने नमुद ठिकाणी तपासणी केली असता, सदर युनिटचे मालक पंकज ठक्कर हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील गहू व तांदूळ साफसफाईच्या नावाखाली घेऊन त्यांच्या मूळ गोण्या बदलून, सदर धान्य नविन गोण्यांत भरुन नफेखोरीच्या उद्देशाने काळाबाजार करतात. त्याबाबत संबंधित पथकाच्या वतीने अेस (Ace) इंटरनॅशनल चे मालक पंकज ठक्कर यांचेविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३११२/२०१२, दिनांक ०३/११/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन कायदेशिर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

मे. अेस इंटरनॅशनल येथे दाखल गुन्हा नोंद प्रकरणी तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (गुन्हे), तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी दिनांक २१/०१/२०१३ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार, सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला तांदळाचा साठा हा श्री गजानन ट्रेडिंग कंपनीच्या मालकीचा असल्याचे पंकज ठक्कर यांनी दिलेल्या जबाबात नमूद केले होते. तथापी, श्री गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक श्री. अशोक परशुराम तुपे यांचेकडे दिनांक १५/०१/२०१३ रोजी पुन्हा पोलिस ठाणेस बोलावून त्याचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक चौकशी केली असता, त्याने सांगितले की, त्याचे मालकीची श्री गजानन ट्रेडिंग कंपनी ही त्याने सन २००९ पासून बंद केलेली आहे. त्यामुळे त्याचा सन २००९ पासून सदर कंपनीच्या कोणत्याही मालाच्या खरेदी विक्रीच्याबाबत संबंध राहिलेला नाही. तसेच गुन्ह्यातील त्याचे कंपनीचे नावे असलेला एकूण २५६० तांदळाच्या गोण्या त्यामध्ये ५० किलो व १०० किलो वजनाचा माल हा कांजी बंच्चू रावरीया याने त्याचे कंपनीचे लेटर पॅड तयार करुन तो माल त्या लेटर पॅडद्वारे अेस इंटरनॅशनल कंपनी येथे साफसफाई करण्यासाठी पाठविला आहे, असे नमूद आहे. सदरच्या मालाशी त्याचा

काहीएक संबंध नाही. सदरचा तांदूळ हा कानजीभाई बंच्चू रावरीया व पंकज ठक्कर यांनी मिळून शालेय पोषण आहार योजनेचा मे. पटेल वेअर हाऊस येथील ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. तसेच सदरचा जप्त केलेला तांदळाचा साठा हा खुल्या बाजारामधील भासविण्यासाठी त्याचे कंपनीच्यां नावाचे खोटे पावती पुस्तक छापून कानजीभाई रावरीया व अेस इंटरनॅशनचे मालक पंकज ठक्कर यांनी सदर मालाचा गैरवापर केलेला आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल व झाले व्यवहाराशी त्याचा काहीएक संबंध नाही. त्याने यापुर्वी दिनांक ०५/११/२०१२ रोजी दिलेला जबाब हा कानजीभाई हा त्याचेकडे यापूर्वी नोकरी करीत होता. त्यामुळे त्याचेवर विश्वास ठेऊन त्याचे सांगणेप्रमाणे दिला होता. सदरचा जबाब चुकीचा आहे. अशा प्रकारची हकीकत सांगितल्याने त्याचा सविस्तर जबाब नोंद करुन मुळ कागदपत्रात सामील करण्यात आलेला आहे. त्यानंतर सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे कानजीभाई बंच्चू पटेल उर्फ रावरीया याचा शोध घेऊन त्यास दिनांक १६/०१/२०१३ रोजी अटक करुन त्याचेकडे सदर गुन्ह्याबाबत अधिक विचारपुस केली असता, त्यानेही अशोक परशुराम तुपे यांचेसारखी मिळतीजुळती हकीकत सांगून पंकज ठक्कर यांनी सदरचा माल हा मे. पटेल वेअरहाऊस नेरुळ येथील असून ईस्कॉन फुड या संस्थेचे संबंधित श्री परती यांचेकडून काळ्या बाजाराने खरेदी केलेला आहे. सदरचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे भासविण्यासाठी गजानन ट्रेडिंग कंपनी याचे बनावट लेटर पॅड वापरुन व दाहोद गुजरात येथील सनवालीया ट्रेडिंग कंपनी येथून खरेदी केल्याची बनावट बिले आणून पंकज ठक्कर यांचेशी संगणमत करुन आणले असल्याचे कानजीभाई याने कबूल केलेले आहे. एंकदरीत झाले तपासामध्ये नमुद अटक आरोपीतांनी आपसात संगणमत करुन सदरचा जप्त मुद्देमाल हा दाहोद गुजरात येथून गजानन ट्रेडिंग कंपनी कर्जत यांनी खरेदी केल्याचे दाखवून त्याची बनावट बिले व गजानन ट्रेडिंग कंपनी कर्जत ही सन २००९ मध्ये बंद झाली असतानाही त्याचे बनावट लेटर पॅड वापरुन घटनास्थळी आणून ठेवल्याचे निष्पन्न झाले असल्याने सदर गुन्ह्यामध्ये भादवि कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ हे कलम दिनांक १७/०१/२०१३ रोजी वाढविण्यात येवुन मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यास तुर्भे पोलिसांनी दिनांक ०७/०२/२०१३ रोजी अटक केल्याचे नमूद आहे.

मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेस शालेय पोषण आहार योजने अंतर्गत ताडदेव, मिरा भाईंदर, पालघर व वाडा या विभागामधील संलग्न असलेल्या शाळेतील शालेय विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न देण्यासाठी शासनाने करारबद्ध केले आहे. प्राधिकृत वाहतुकदार म्हणुन मे. महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमरर्स फेडरेशन यांना शासनाचे वतीने प्राधिकृत केले असुन त्याअनुषंगाने शासनाकडून प्राप्त होणाऱ्या नियतनानुसार भारतीय खाद्य निगम यांचे गोदामातुन तांदळाच्या साठ्याची उचल करुन थेट संबंधित संस्थेच्या विभागीय केंद्रीय स्वयंपाकगृहात पुरवठा करण्याचे आदेश आहेत. सदर प्रकरणी मे. महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमरर्स फेडरेशन यांनी अथवा त्यांच्या वतीने व त्यांचे स्तरावर त्यांनी करारबद्ध केलेल्या उपवाहतुकदार यांनी वरील नमूद विभागांचा तांदळाचा साठा हा

0039 भारतीय खाद्य निगम यांचे गोदामातुन उचल करुन तो मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या केंद्रीय स्वयपांकगृहात वितरण न करता तो नियमबाह्य पद्धतीने वरील चारही विभागापासुन अलिप्त असलेल्या तसेच सोयीस्कर नसलेल्या ठिकाणी म्हणजेच मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि. यांच्या नवी मुंबई येथील वेअरहाऊसवर दिनांक १४/०९/२०११ पासुन वितरण केल्याचे दिसुन येते. सदरचे वेअरहाऊस हे चारही विभागांपासुन अलिप्त असुन विभागीय कार्यक्षेत्रांच्या बाहेर असताना वाहतुकदारांनी कोणताही अतिरिक्त मोबदला न घेता साठ्याचे वितरण केले ही साशंकता निर्माण करणारी बाब आहे. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांचा मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि. या वेअरहाऊसच्या मालकासोबत साठवणूकीकरीता कोणत्याही प्रकारचा साठवणूक करारनामा केला नसल्याचे दिसुन येते. तसेच नमूद वेअरहाऊसवर साठवणूक करण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका, शिक्षण मंडळ यांचे दिनांक १८/०१/२०१० रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्राबाहेर साठवणूकीस परवानगी दिली आहे. तसेच पंचायत समिती, पालघर यांनी दिनांक २४/०९/२०१० रोजी दिलेल्या परवानगीनुसार शालेय पोषण आहार योजनेच्या तांदुळ साफसफाईकरीता त्यांनी वाशी, नवी मुंबई, पनवेल येथे ट्रक घेऊन जाण्यास परवानगी दिली असुन त्याकरीता त्यांनी चार ट्रक क्रमांक नमूद करुन सदर ट्रकद्वारेच साठा घेऊन जाण्यास परवानगी दिली आहे. वरील दोन्ही प्राधिकरणाकडील परवानगीपत्राचे अवलोकन करता त्यांनी मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि., नवी मुंबई या वेअरहाऊसचा कोठेही उल्लेख केल्याचे दिसुन येत नाही. उर्वरीत विभागांपैकी पंचायत समिती कार्यालय, वाडा यांनी दिनांक ०५/१२/२०१२ रोजी ग्लोबल सिड्स अँड स्पाईसेस, वाशी, नवी मुंबई या वेअरहाऊसकरीता तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग यांनी दिनांक २४/१२/२०१२ रोजी वाशी, नवी मुंबई या विभागाकरीता परवानगी दिली आहे म्हणजेच या कार्यालयाचे वतीने करण्यात आलेल्या कायदेशीर कारवाईनंतर दोन्ही विभागांकडून मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेस साफसफाई करीता परवानगी दिल्याचे दिसुन येत असुन ही अत्यंत खेदजनक बाब आहे. यावरुन मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी नियमबाह्य पद्धतीने नमूद वेअरहाऊसवर शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विनापरवानगी अवैध साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे.

मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि., नवी मुंबई यांचे वेअरहाऊसमधील साठवणूकीसंबंधीचे अभिलेख म्हणुन सादर केलेल्या साठापुस्तकाचे अवलोकन केले असता, मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने नमूद वेअरहाऊसमध्ये दिनांक १४/०९/२०११ पासुन शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदळाच्या साठ्याची साठवणूक करीत असल्याचे दिसुन येत आहे. साठवणूक केलेल्या साठ्यापैकी दिनांक ०१/०८/२०१२ पुर्वीच्या साठवणूक केलेल्या साठ्याची उचल केल्याचे दिसून येते. तद्नंतर दिनांक ०१/०८/२०१२ व ०३/०८/२०१२ रोजी वितरण आदेश क्रमांक अनुक्रमे १३२१५ व १३२२३ अन्वये अनुक्रमे ११०० व ४४० बाचकी तांदळाचा साठा साठवणूक केला

असताना तो साठा सुमारे दोन महिन्यानंतर म्हणजेच दिनांक २२/१०/२०१२ व २३/१०/२०१२ रोजी उचल केल्याचे दिसुन येते. तथापी, दिनांक ०४/०८/२०१२ ते २१/१०/२०१२ या कालावधीत एकुण २० वितरण आदेशांन्वये साठवणूक केलेल्या १५४५७ बाचक्यांमधील तांदळाच्या साठ्यापैकी दिनांक २५/१०/२०१२ रोजी केवळ २९ बाचक्यांमधील साठ्याचे उचल करुन उर्वरीत १५४२८ बाचक्यांमधील तादंळाचा साठा जैसे-थे स्थितीत साठवणूक केल्याचे दिसुन येते. वेअरहाऊसच्या साठापुस्तकानुसार त्यांनी दर्शविलेला अखेर शिल्लक साठा हा ७९१४ क्विंटल असुन प्रत्यक्षात पथकाने पंचासमक्ष मोजदाद केलेला साठा ७६३३.५० क्विंटल आहे. म्हणजेच साठापुस्तकानुसार २८०.५० क्विंटल साठा हा साठापुस्तकापेक्षा कमी असल्याचे आढळुन येते ही बाब नमूद करावीशी वाटते. वास्तविक पाहता शासनाकडून प्राप्त नियतनानुसार नियमितपणे उचल केलेल्या साठ्याची खिचडी शिजवण्याकरीता आवश्यकतेनुसार नियमितपणे गरज भासते. परंतु मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी दिनांक ०४/०८/२०१२ पासुन साठवणूक केलेला साठा आहे त्या स्थितीत जतन करुन ठेवण्याचे प्रयोजन काय? सदर प्रकरणी घटनास्थळी आरोपीतांनी दिलेल्या जबाबांमध्ये जप्त करण्यात आलेला तांदळाचा साठा हा माहे जुन, २०१२ पासुन साठवणूक केला असुन सदर साठ्याची पत राखण्यासाठी सुनिलकुमार परती हे नियमितपणे फ्युमिगेशन (फवारणी) करुन घेत असल्याचे नमूद केले आहे. सुनिलकुमार परती यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबानुसार ते चारही विभागाचा तांदळाचा साठा हा साफसफाई करीता नमूद वेअरहाऊसवर आणत असल्याचे सांगितले. तथापी, मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि., या वेअरहाऊसचे व्यवस्थापक यांनी दिलेल्या जबाबात त्यांचे वेअरहाऊसमध्ये साफसफाईची प्रक्रिया केली जात नसल्याचे सांगितले. सदर प्रकरणी घटनास्थळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने मे. अेस इंटरनॅशनल, तुर्भे येथे धाड टाकुन जप्त केलेल्या तांदळाच्या साठ्यासंदर्भात तेथील तपासी पोलिस अधिकारी यांनी मे. अेस इंटरनॅशनल येथे जप्त असलेला तांदळाचा साठा हा मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी पंकज ठक्कर यांना अवैध मार्गाने विक्री केल्याचे निष्पन्न झाल्याने तपासी पोलिस अधिकारी यांनी तुर्भे पोलिस ठाणे येथील गुन्हा नोंद प्रकरणी सुनिलकुमार परती यांना दिनांक ०७/०२/२०१३ रोजी तसेच नेरुळ पोलिस ठाणे यांनी दिनांक २८/०३/२०१३ रोजी अटक केली आहे. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी त्यांच्या संस्थेस शासनाकडून प्राप्त झालेला गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांकरीता असलेला शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदळाचा साठा हा साफसफाईचे निमित्त करुन घटनास्थळी नफेखोरीच्या उद्देशाने विनापरवानगी अवैध साठवणूक करुन सदरचा साठा हा मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि.चे संचालक तसेच मे. अेस इंटरनॅशनलचे मालक यांचेशी संगनमत करुन तो गैरमार्गाने व काळ्याबाजाराने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विक्री करीत असल्याचे निष्पन्न होत आहे. मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार परती यांनी त्यांच्या संस्थेस प्राप्त झालेला तांदळाचा साठा हा शालेय

विद्यार्थ्यांकरीता पुर्णपणे वापर न करता, प्राप्त साठ्यापेक्षा अतिरिक्त साठ्याचे बिल आकारणी करुन संबंधित गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांना सदर अन्नपासुन वंचित ठेवल्याचा गंभीर अपराध केल्याचे सिद्ध होत आहे. सबब, मे. वेलवर्थ फुड्स प्रा.लि. येथील जप्त करण्यात आलेला १५२६७ बाचक्यांमधील ७६३३.५० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ३०४१/२०१२ दिनांक ०३/११/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात राहून पुढील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या १५२६७ बाचक्यांमधील ७६३३.५० क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्यात यावा.

१) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण तांदळाचा साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ. परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित बाजारमुल्याप्रमाणे विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. इस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशनचे शाखा व्यवस्थापक सुनिलकुमार रणधिरचंद परती.

२) मे. एस इंटरनॅशनलचे मालक पंकज ठक्कर.

३) मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. चे संचालक इम्रान फारुख पटेल.

0042

४) मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. चे संचालक शकील इस्माईल पटेल.
५) मे. वेलवर्थ फुड प्रा.लि. चे व्यवस्थापक प्रशांत सुरेश पवार
६) मे. महाराष्ट्र स्टेट कन्झुमर मार्केटिंग फेडरेशन लि. या वाहतूकदाराचे प्रतिनिधी
७) मे. विशाल ट्रान्सपोर्टचे मालक
८) मे. साई ट्रेडिंग ॲण्ड मार्केटिंग कंपनीचे मालक
९) मे. ए.बी. पाटील ॲन्ड सन्स या वाहतुकदाराचे मालक
(वरिष्ठ पोलिस निरीक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

**प्रत,**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्यांची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.